
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : का.वा
दा. क्र. 2003

2003

# चितोडगड

IRBK-0102003
IRBK-0102003



श्री सयाजी बालज्ञानमाला - पुष्प १८१ वें

नों. ११५७८

वा. नं. ८८०

ग्रंथ संग्रहालय वाचनालय शाखा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २००३ नों. दि
वि. ......

IRBK-0102003

IRBK-0102003

श्रीसयाजी बालज्ञानमाला – पुष्प १८१ वें

# चितोड

लेखिका :

आनंदीबाई जयवंत

कुळकथा, चितोडचा चंद्र, जगाशीं बंडखोरी, उर्मिला,
पारंब्या, बाबूच्या लीला, आमचा श्याम व इतर
गोष्टी, शिकार, શિશુરંજન વાતો, બાબૂના
અડપલા या पुस्तकांची कर्त्री

आवृत्ति १ ली　　　　सन १९४४

प्रती १०००　　　　किंमत ६ आणे

प्रकाशक :

पुरुषोत्तम आत्माराम चित्रे,

खारीबाव, बडोदें.

मुद्रक :

पुरुषोत्तम आत्माराम चित्रे,

आत्माराम प्रेस, खारीबाव, बडोदें.

श्री

# विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें विद्याभिलाषी कै. श्रीमंत सरकार महाराजसाहेब सर सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादूर, जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई., एल्एल्. डी., यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजांतून " श्रीसयाजी बालज्ञानमालें "त विविध विषयांवर पुस्तकें करण्यांत येत असतात.

तदनुसार **चितोड** या नांवाचा ग्रंथ श्रीमती **आनंदीबाई जयवंत** यांजकडून तयार करविला, तो उक्त मालेंतून १८१ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषान्तरशाखा,
प्राच्यविद्यामंदिर,
बडोदें
१०–८–४४

भा. प्र. कोठारी.
भा. मदतनीस

ज्यो. मा. महेता.
विद्याधिकारी,
राज्य बडोदें

# आभार

चितोडच्या इतिहासप्रसिद्ध किल्ल्याचें वर्णन करावयाचें म्हणजे प्रत्यक्ष तो किल्ला पाहूनच करायला पाहिजे असें वाटलें आणि चितोडला जाण्याचें ठरविलें. चितोडचा किल्ला मेवाडांतील उदयपूर संस्थानांत असल्यामुळे संस्थानची परवानगी असणें अवश्य होतें. उदयपूर संस्थानचे रेव्हिन्यू कमिशनर डॉ. मोहनसिंह मेहता, बॅर-ॲट-लॉ, यांचेकडे परवानगी मागितली. डॉक्टरसाहेबांनी व उदयपूर संस्थानचे पब्लिक इन्स्ट्रक्टर रावसाहेब पंडित लक्ष्मीलालजी जोशी, एम्. ए., एल्एल्. बी., यांनी सर्व प्रकारें मदत दिल्यामुळे चितोडवरील इतिहासप्रसिद्ध स्थळांची खात्रीपूर्वक माहिती मिळवितां आली. त्याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

त्याचप्रमाणे चितोड किल्ल्यावरील किल्लेदार श्री. गोविंदसिंह पंचोली यांनी आमच्येबरोबर किल्ल्यावर हिंडून सर्व माहिती सांगितल्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें जरूर आहे.

श्रीसयाजीबालज्ञानमालेने हें पुस्तक प्रकाशित करण्याची संधि दिल्याबद्दल मी मालेची ऋणी आहे.

'दिलखुश', शिवाजी रोड,<br>बडोदें. ता. २८-७-४४

आनंदीबाई जयवंत

# आधारभूत ग्रंथ


१. मध्ययुगीन भारत

२. राजस्थाननो इतिहास

३. महाराष्ट्र ज्ञानकोश

४. राजपूत राजांचा उदय व ऱ्हास

५. राजपुताने का इतिहास

६. राष्ट्रतीर्थ


७. मेवाड की विभूतियाँ

८. राइज् ऑफ दि ख्रिश्चियन् पॉवर् इन् इंडिया


९. इंपीरियल गॅझेट

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकरण १ लें | .... .... .... | १ |
| २. | प्रकरण २ रें | .... .... .... | ५ |
| ३. | प्रकरण ३ रें | .... .... .... | १० |
| ४. | प्रकरण ४ थें | .... .... .... | १३ |
| ५. | प्रकरण ५ वें | .... .... .... | १७ |
| ६. | प्रकरण ६ वें | .... .... .... | २१ |
| ७. | प्रकरण ७ वें | .... .... .... | २४ |
| ८. | प्रकरण ८ वें | ... ... ... | ३० |
| ९. | प्रकरण ९ वें | ... ... ... | ३४ |
| १०. | प्रकरण १० वें | ... ... ... | ३९ |
| ११. | प्रकरण ११ वें | ... ... ... | ४५ |
| १२. | प्रकरण १२ वें | ... ... ... | ५१ |
| १३. | प्रकरण १३ वें | ... ... ... | ५५ |
| १४. | प्रकरण १४ वें | ... ... ... | ६० |
| १५. | प्रकरण १५ वें | .... .... .... | ६७ |
| १६. | प्रकरण १६ वें | .... .... .... | ७१ |



मेवाड़ राज्य
आमेट
सरदारगढ़
राजसमुद्र
बेदला
उदयपुर
सिरोही
पलासिया
खेरवाड़ा
डूंगरपुर
सराड़ा
सलुम्बर
जयसमुद्र


जैपुर
जहाजपुर
कोटडी
माडलगढ
बिजोलिया
भीलवाडा
पारसोली
चितोडगढ
टोंक
इंदौर
सादडी
प्रतापगढ

# चितोड

## प्रकरण १ लें

आपला हिंदुस्थान देश जेवढा मोठा आहे तेवढाच आपल्या देशाचा इतिहास जुना आणि मोठा आहे. पांच हजार वर्षांपासूनच्या इतिहासांत ज्या गोष्टी घडल्या त्या पौराणिक कथा म्हणून आपण म्हणतों. आपल्या या पौराणिक कथा म्हणजे रामायण व महाभारत या ग्रंथांमधील होत. या कथांतून आपण ज्या ज्या थोर थोर वीरांच्या कथा वाचतों-ऐकतों त्यांत त्या वीरांच्या चारित्रावरून आपल्याला कळून येतें कीं, त्यांच्या अंगीं कसकसें गुण होते! वीर्य, धैर्य, औदार्य, भक्ति, स्नेह, धार्मिकपणा वगैरे गुण ज्यांच्यांत आहेत अशा वीरांच्या चरित्रांच्या कथांचाच तो इतिहास आहे.

भारत-रामायणासारखाच चितोडचा इतिहास आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. चितोडच्या इतिहासांत सुद्धां उज्ज्वल मातृ-पितृ-भक्ति, बंधुप्रीति, पतिप्रेम, देशभक्ति आणि स्वामीभक्ति कशी असावी याचें जिवंत चित्र डोळ्यांपुढें उभें राहील असे अनेक प्रसंग आणि शूर वीरांच्या कथा आहेत. चितोडचा इतिहासप्रसिद्ध किल्ला एकदां प्रत्यक्ष पाहावा अशी माझी कधींपासून तरी इच्छा होती. परंतु नुसती

इच्छा असून उपयोग नसतो आणि मुद्दाम योग जुळून येत नाहीं तर आणावा लागतो. शेवटीं साऱ्या अडचणी दूर सारून जाण्याचा निश्चयच केला. चितोडलाच न जातां ज्या उदयपुर संस्थानाच्या ताब्यांत चितोड किल्ला आहे तें उदयपुरहि पाहून यायचें असें ठरवून निघालों. पण निघण्यापूर्वीं उदयपुर संस्थानची परवानगी घेऊन गेल्यास सारीं स्थळें नीट पाहायला मिळतील असें वाटलें आणि त्याप्रमाणें आम्ही संस्थानच्या अधिकाऱ्यांना पत्र लिहून चितोड पाहण्याची इच्छा दर्शविली. आम्हांला जी कांहीं मदत लागेल ती देण्याचें आनंदानें त्या अधिकाऱ्यांनीं कबूल केलें.

जाण्याचा दिवस नक्की ठरविला. परंतु हल्लींच्या लढाईच्या परिस्थितींत जावें कीं नाहीं असें मनांत येऊं लागलें. पण एकदां विचार केला तो मागें घ्यायचा नाहीं असें वाटून निघालोंच. हळुंहळूं सात-आठ मंडळी निघालीच. बडोद्याहून ता. २८-९-४२ रोजीं सकाळीं दहाच्या गाडीनें आम्ही निघालों. उदयपुरास बडोद्याहून जायला दोन रस्ते आहेत—एक रतलामकडून आणि दुसरा अमदावादकडून. अमदाबादकडून जाणाऱ्या रस्त्याला भाडें जास्त असून लांबचा प्रवास आहे, पण आम्ही तिकडूनच जायचें ठरविलें होतें. अमदाबादला गाडी बदलून मिटरगेजमध्यें बसावें लागतें. 'अमदाबाद-उदयपुर' या डब्यांत बसल्यास मध्यंतरीं कुठेंच गाडी बदलावी लागत नाहीं. नाहींतर पुढें मारवाड जंक्शन व मावली जंक्शनवर आणखी गाड्या बदलाव्या लागतात. पण उदयपुराचा स्वतंत्र डबा मिळाल्यास दोन ठिकाणचा त्रास चुकतो.

दुसरे दिवशीं दुपारीं आम्ही उदयपुरास पोंचलों. तीन दिवस

राहून पाहण्यासारखीं स्थळें पाहून चौथ्या दिवशीं मोटारनें निघालों. कारण आम्हांला चितोडच्या राजांचें कुलदैवत जें एकलिंगजी त्याचें दर्शन घ्यायचें होतें. उदयपुर शहरापासून एकलिंगजी गांव सोळा मैल आहे व तेथून पुढें सोळा मैलांवर पुष्टीमार्गी वल्लभाचार्यांची गादी व श्रीनाथजीचें मंदिर नाथद्वारा गांवीं आहे. आम्ही एकलिंगजीचें दर्शन घेऊन तसेच पुढें निघालों. नाथद्वाराला एक दिवस राहून दुसरे दिवशीं चितोडला जाण्यास निघालों.

चितोडला जातांना मावली जंक्शन लागतें आणि येथें गाडी बदलावी लागते, परंतु नाथद्वारा स्टेशनवरच चितोडच्या डब्यांत बसलें म्हणजे गाडी बदलण्याचा त्रास चुकतो. आम्ही चितोडच्याच डब्यांत बसलों. चितोडला जाणारी रेल्वे उदयपुर संस्थानची आहे. दुपारीं दीड वाजतांच चितोड स्टेशन येतें.

चितोड स्टेशन जवळ येऊं लागतांच चितोडचा सुप्रसिद्ध किल्ला दिसूं लागतो. चितोडच्या पराक्रमी वीरांनीं शेंकडों वर्षें ज्या किल्ल्याचें रक्षण केलें, जेथून मोठमोठ्या लढाया मारल्या, मोठमोठ्या सैन्यांचा पराभव केला आणि मोठमोठ्या लढवय्यांना दांतीं तृण धरायला लावलें त्या किल्ल्याचा भव्य तट दृष्टीस पडतांच चितोडच्या शूर वीरांच्या जाज्वल्य देशाभिमानाच्या कथा आठवल्या. ज्यांनीं आपल्या बाहुबळाच्या पराक्रमानें कैक वर्षें हिंदुस्थानाला स्वातंत्र्याच्या शिखरावर विराजत ठेवलें होतें, त्या वीरांची ही जन्मभूमि व कर्मभूमि म्हणून मनांत एक प्रकारचा स्वाभिमान व सात्विक भाव उत्पन्न झाला. चितोडच्या किल्ल्यासंबंधानें हिंदींत एक म्हण आहे—

तालमे ताल भोपाल ताल, और सब तलैया है
गढमे गढ चितोडगढ, और सब गढैया है ॥

आणि खरोखरीच चितोडगड दुरून पाहूनच तो सर्व गडांत श्रेष्ठ कां आहे याची खात्री पटते.

# प्रकरण २ रें

इस वृद्ध भारतवर्ष का, अब शेष गौरव है कहां ।
सतियां सहस्रो साथही, जलछार होती थीं जहां ॥
वह धर्मक्षेत्र पुनीतपावन, कौनसा किस देश में ।
विख्यात जग चित्तौड़ है, वह मेदपाट सुदेश में ॥
(पंडित उमाशंकरजी द्विवेदी)

चितोडचा किल्ला मेवाडांत येतो. मेवाड हें नांव मेदपाट यावरून पडलें. या जमिनीवर खूप लढाया झाल्या, शत्रूंच्या मेदांनीं म्हणजे प्रेतांनीं ही जमीन नेहमीं भरून निघे, म्हणून मेदपाट म्हणत आणि पुढें मेवाड हें नांव प्रचारांत आलें. मेवाड देशाची तसू-तसू भूमि आणि अरवलीची एकूण एक टेकडी वीरांच्या रक्तांनीं पावन झालेली आहे. मध्यपाट म्हणूनही कोणी म्हणतात.

आम्ही चितोड स्टेशनवर उतरल्यावर प्रथम जवळच्याच धर्मशाळेंत गेलों, पण ती जागा आम्हांला पसंत पडली नाहीं म्हणून स्टेशनवरच रिटायरिंग रूम भाड्यानें घेतली. सबंध दिवस तेथेंच राहावें लागणार होतें, कारण दुसऱ्या दिवसाशिवाय गाडीच नव्हती. स्टेशनपासून चितोड गांव दोन मैल लांब आहे.

गांवांत जाण्याला स्टेशनवर टांगे मिळतात. हेच टांगे थेट किल्ल्यावर घेऊन जातात आणि परत प्रवाश्यांना स्टेशनवर आणून सोडतात. भाडें कांहीं विशेष नसतें, दोन-पावणेदोन रुपये घेतात.

स्टेशन सोडलें कीं दीड मैलावर गंभीरा नदी लागते. या नदीवरचा पूल इ. स. १४ व्या शतकांत अल्लाउद्दीनाचा मुलगा खिजरखान यानें केला. नदींत पाणी बरेंच होतें. सप्टेंबर-ऑक्टोबरांत मेवाडांत जाण्याला दिवस चांगले असतात. नुकताच पावसाळा संपलेला असतो, त्यामुळें नदीनाले पाण्यानें तुडुंब भरलेले असतात आणि डोंगरावरचीं झाडें हिरवींगार दिसून जिकडे तिकडे डोळ्यांना आल्हाद वाटणारा मनोहर देखावा दिसतो.

नदीचा पूल ओलांडल्यावर थोडेसें पुढें गेलें कीं महाराणा हायस्कूलची दगडी इमारत लागते. इमारत प्रशस्त आहे. कांहीं मुली देखील इंग्रजी शिक्षण याच स्कूलांत घेत असल्याचें कळलें. हायस्कूलाच्या नंतर एक मोठा थोरला दरवाजा लागतो. या दरवाजाला पूल दरवाजा म्हणतात. हें चितोड गांवाचें प्रवेशद्वारच आहे. दरवाजापासूनच गांवाला सुरवात होते.

चितोड हें पूर्वीं शहर होतें. परंतु अलीकडे वसलेलीं मोठमोठीं शहरें पाहिल्यावर हें एक लहानसें गांवच वाटतें. चितोड गांवाची वस्ती सुमारें सहा हजारापर्यंत आहे. शिवाय किल्ल्यावर दीड-दोन हजारांची वस्ती आहे.

दरवाजांतून आंत शिरलें कीं मुख्य बाजारपेठेंतून किल्ल्यापर्यंत जावें लागतें. हाही रस्ता साधारणतः किल्ल्यापर्यंत दोन मैल आहे. गांवाच्या शेवटीं सरकारी कचेरी आहे. किल्ल्यावर चढण्यापूर्वी कचेरींतून किल्ला पाहण्यासाठीं परवानगीचा पास घ्यावा लागतो. पण आम्ही उदयपुरच्या अधिकाऱ्यांना कळविलें होतें, म्हणून पासाची जरूर

चितोड.



लागली नाहीं. उलट किल्ल्याची माहिती देण्यासाठीं किल्लेदार श्री. पंचौली हे स्वतःच आमचेबरोबर आले. त्यामुळें नुसतें पाहून येण्यापेक्षां चालतां चालतां आम्हांला ऐतिहासिक माहिती कळत होती.

चितोड किल्ला अरवली पर्वतांच्या रांगेंत आहे. अरवलीची उंची साडेपांच हजार फूट आहे. अरवलीला हिंदुस्थानचा अपेनाईन म्हणतात. अरवलीचें निसर्गतःच दोन विभाग पडतात—पूर्व राजपुताना व पश्चिम राजपुताना. दक्षिणेच्या बाजूला अबूचें गुरुमुख शिखर आहे. अजमीरापर्यंत अरवलीची कक्षा आहे. तेथून ज्या उंच उंच टेकड्यांच्या रांगा आहेत त्या अलवार संस्थानापर्यंत पसरलेल्या असून दिल्लीपर्यंत गेलेल्या आहेत. पश्चिम व पूर्वेस चंबळ, वेत्रवती, शोणभद्र या महानद्या आणि बेरिस, कोटासर, खारी व दायी या नद्या यांच्यामुळें तो प्रदेश सुपीक बनलेला आहे. पश्चिमेच्या बाजूला कच्छचें रण असून यांतच लूनी नदी गुप्त झालेली आहे.

राजस्थान अथवा राजवाडा यालाच राजपुताना म्हणतात. याच्या भौगोलिक मर्यादा अशा आहेत:—उत्तरेस सतलज; पश्चिमेस सिंधू; दक्षिणेस विंध्य; पूर्वेस चंबळा व यमुना यांचा संगम; नैऋत्येस कच्छच्या रणांतील लूनी; वायव्य प्रदेश पंजाबापासून थारच्या वाळवंटानें संरक्षित राहतो; ईशान्येस पंजाब दिल्लीची सरहद्द बनला आहे आणि आग्नेय भागापासून राजपुताना मध्यभारतापासून वेगळा गणला जातो.

या प्रदेशाचें क्षेत्रफळ साडेतीन लक्ष चौरस मैल आहे. २२° ते ३०° उत्तर अक्षांशांत व ६९° ते ७८° पूर्व रेखांशांत राजपुताना

बसलेला आहे. अरवलीमुळेंच राजस्थानाचे दोन तुकडे पडतात. पूर्वेच्या बाजूचा भाग लहान असून सुपीक आहे. पश्चिमेचा भाग दुप्पटीनें मोठा आहे. लहान भागांतच उदयपुर उर्फ मेवाड, बुंदी, कोटा, जयपुर हीं संस्थानें असून पश्चिमेच्या रखरखीत भागांत जोधपुर उर्फ मारवाड, बिकानेर, जेसलमीरचीं संस्थानें आहेत. अरवलीच्या उत्तर विभागांत पश्चिम पायथ्याशीं सांबरचें खाऱ्या पाण्याचें सुप्रसिद्ध मोठें सरोवर आहे. येथें मीठ तयार होतें. मेवाडांत दरसाल २० पासून २७ इंचापर्यंत पाऊस पडतो.

आम्ही गेलों ते अशाच वेळीं सप्टेंबर-आक्टोबरच्या दर मान. यामुळें मेवाडांतील निसर्गसौंदर्य आम्हांला मनमुराद पाहायला मिळालें. ठिकठिकाणचीं विपुल जलाशयें, वृक्षलतांनीं आच्छादित अशा लहान-मोठ्या टेकड्या, व सपाट जमिनीवरील उभीं पिकें पाहून आम्हांला किती आनंद झाला तो वर्णन करतां येत नाहीं.

मेवाडचें क्षेत्रफळ बारा हजार सहाशें एक्याण्णव मैल आहे. एकंदर लोकसंख्या १५,६६,९३९ सन १९३१ च्या वस्तीगणतींत झालेली होती. उत्पन्न चौऱ्यांशी लक्षांचें आहे.

चितोड समुद्रसपाटीपासून १८५० फूट उंच असून चितोडगड गांवापासून पांचशें फूट उंच आहे. किल्ल्याचा परिघ सात मैल असून लांबी साडेतीन मैल आणि रुंदी कुठें अर्धा तर कुठें पाव मैल आहे.

सातव्या शतकांत चितोडचा किल्ला बाप्पा रावळ यानें जिंकून घेतला असला तरी त्यानें तेथें राजधानी केली नव्हती. दिल्लीजवळील नागदा येथें राजधानी होती. सन १२१३ मध्यें महाराणा जैत्रसिंह यानें

चितोडला राजधानी आणली. कारण शमसुद्दीन अल्तमश यानें नागद्याचा नाश केल्यामुळेंच चितोडचा किल्ला मजबूत जाणून राजधानी करण्यांत आली. सन १५६७ पर्यंत चितोडच राजधानीचें ठिकाण होतें, परंतु पुढें मात्र महाराणा उदयसिंहानें उदयपुर वसवून राजधानी तिकडे केली.

चितोड हें ठिकाण मजबूत असल्यामुळेंच बाराव्या शतकापूर्वी सातव्या शतकापासून तें राजपूतांचें लष्करी ठाणें असलें पाहिजे, आणि म्हणूनच चितोडला महत्त्वाच्या लढाया झालेल्या आहेत असें इतिहासावरून कळून येतें. कारण इतिहासांत ज्या मोठमोठ्या लढाया झालेल्या वर्णिलेल्या आहेत त्यांत चितोडचेंच वर्णन आहे, नागद्याचें नाहीं.*

---

* चितोड शहरापासून सात मैलांवर एक अतिशय जुनें नागरी नांवाचें खेडेगांव आहे. तेथें खिस्तापूर्वीचीं कांहीं नाणीं व शिलालेख यांचा शोध लागलेला आहे. नागरी गांवाचें पूर्वीचें नांव मध्यामिका असें होतें. तेथें शिबी नांवाचा राजा राज्य करीत होता. खि. पू. १५४ च्या सुमारास मेनांडर या ग्रीक राजानें स्वारी करून शिबीला जिंकलें असा शिलालेखांत उल्लेख आहे आणि तो शिलालेख शुंगकाळचा आहे.

# प्रकरण ३ रें

टांगे वर चढूं लागले आणि किल्ल्याचा पक्का मजबूत तट दिसूं लागला. रस्ता चांगला रुंद असून खडा चढ नसल्यामुळें तितका त्रास होत नाहीं. पण रस्त्यांत कोठें खांचखळगे तर कोठें दगड असल्यामुळें टांगे खडखडूं लागले म्हणजे मात्र अंगाला एकसारखे धक्के बसूं लागतात. एका बाजूस डोंगर भिंतीसारखा आहे असें वाटतें. हल्लीं जो दगडी तट दिसतो तो कै. महाराणा फत्तेसिंहजी यांनीं सन १८८२ त नव्यानें केला. अकबरानें चितोडचा विध्वंस केला, तेव्हां तट सुद्धां तोडून टाकला होता. अल्लाउद्दीनानें किल्ल्याचा विध्वंस केला त्यापेक्षांहि जास्त अकबरानें केला. पुढें राणा प्रतापचा नातू जगत्‌सिंह यानें तटाचें बांधकाम सुरू केलें होतें, पण शहाजहानानें तट बांधूं दिला नाहीं. उलट, नवा-जुना सारा तट तोडून सपाट करून टाकला आणि सन १६८० त तर औरंगजेबानें येथील अनेक देवळें पाडून किल्ल्याची दुर्दशा करून टाकली. त्यामुळें पुढें अठराव्या शतकापर्यंत तर हा किल्ला ओसाडच होता.

किल्ल्यावर चढतांना एकंदर आठ दरवाजे अथवा पोल लागतात. पहिलाच दरवाजा लागतो त्याला पाडनपोल म्हणतात. खरें नांव पाटवनपोल असून अपभ्रंशानें पाडनपोल असें झालें आहे. पाटवन म्हणजे मुख्य; राजपूतांत मोठ्या राजपुत्राला देखील पाटवीकुंवर म्हणतात.

म्हणून या दरवाजाचें नांव पाटवनपोल होतें. पुढें अशी दंतकथा प्रचलित झाली कीं, लढाईंत या दरवाजाजवळ एवढें रक्त सांडलें कीं, त्यांतून एक पाडा—म्हशीचा टोणगा—वाहून गेला. म्हणून या दरवाजाला पाडन-पोल असें नांव पडलें आणि तेंच अजून रूढ आहे. येथेंच पास दाखवून पुढें जावें लागतें.

पाडनपोलजवळच बाघरावताचें स्मारक एक चबूतरा आहे. सन १५३४ मध्यें गुजरातचा सुलतान बहादुरशहा यानें चितोडवर स्वारी केली, त्या वेळीं चितोडच्या सिंहासनावर सांगा राण्याचा नालायक पुत्र विक्रमादित्य होता. सांगा अर्थात् संग्रामसिंह याच्यासारखें कर्तृत्व त्याच्या अंगीं मुळींच नव्हतें. तो शिकारी आणि कुस्त्यांच्या दंगलींत वेळ घालवीत असे. राज्यकारभाराकडे त्याचें मुळींच लक्ष नाहीं ही संधि साधून बहादुरशहा चितोडवर चालून आला. विक्रमादित्याला लढाई नको होती म्हणून त्यानें सुलतानाशीं तह करून सांगानें त्याचा रत्न-जडित मुकुट व रत्नपेटी आणली होती ती त्याची त्यास परत दिली. शिवाय आणखी नजराणा व उत्तमोत्तम घोडे देऊन तह करून त्याला वाटेस लावला.

सुलतानाशीं राण्यानें तह केला ही गोष्ट चितोडच्या शूर सरदारांस पसंत पडली नाहीं. पण नंतर सन १५३४ मध्यें पुनः बहादुरशहा चितोडवर चालून आला तेव्हां एकही सरदार लढाईला येई ना. विक्रमादित्य घाबरून गेला. त्याची सावत्र आई राणी कर्णावती हिनें मात्र धीर धरून साऱ्या सरदारांना पत्रें लिहिलीं आणि कळविलें कीं, ‘तुमचा स्वामी भ्याड असला तरी तुम्ही चितोडचे स्वामिनिष्ठ सेवक

आहांत आणि चितोड तुमचें आहे. किल्ला मी तुमच्या स्वाधीन करते, वाटल्यास त्याचें रक्षण करा अगर शत्रूच्या हवालीं करा.'

राणीच्या शब्दांनीं राजपूतवीरांचें स्वतंत्र बाण्याचें रक्त सळसळून आलें. सांगा राण्याचा चुलतभाऊ सुरजीचा मुलगा बाघरावत याला सर्वांचें पुढारीपण देऊन ते किल्ल्याच्या रक्षणार्थ आले. बहादुरशहानें यावेळीं बरोबर जंगी तोफखाना आणला होता. तोफांच्या माऱ्यानें गडास एक मोठें थोरलें भगदाड पडलें. परंतु तेथेंच हाडा राजपुत्र अर्जुनसिंह आपले कडवे पांचशें लोक घेऊन उभा होता. त्यांनीं अत्यंत पराक्रम करून अखेरीस तेथें देह ठेवले!

किल्ल्याचें रक्षण होऊं शकत नाहीं असें दिसतांच राणी कर्णावतीनें जोहार केला. तिच्याबरोबर तेरा हजार राजपूत स्त्रियांनीं स्वतःला अग्नींत जाळून घेतलें! हा चितोडचा दुसरा जोहार अथवा साका होय. बाघरावतानें राजचिह्न धारण करून केशरी पोषाक केला आणि तो किल्ल्याबाहेर पडला. पाडनपोलजवळ घनघोर युद्ध झालें आणि बाघसिंह दरवाजाजवळच पडला. तेथेंच त्याचें स्मारक करण्यांत आलें आहे.

जोहार करण्यापूर्वी राणी कर्णावतीनें हुमायून बादशहाला भाऊ म्हणून राखी पाठवून मदतीला बोलावलें होतें, परंतु तो येण्यापूर्वींच किल्ला शत्रूच्या हातीं पडला. परंतु बहादुरशहा परत जातांना मंदोसरजवळ हुमायूनानें त्यास गांठून त्याचा पराभव केला. शहा लज्जित होऊन पळून गेला.

प्रतापगड राज्याकडून बाघसिंहाच्या स्मारकाची पूजा व व्यवस्था अजून होत असते. कारण प्रतापगडचे राजे बाघजीचे वंशज होते.

# प्रकरण ४ थें

पाडनपोलनंतर भैरवपोल नांवाचा दरवाजा लागतो. सन १५३७ मध्यें या दरवाजाजवळ भैरवदास सोलंकी मारला गेला होता, म्हणून या दरवाजाचें नांव भैरव दरवाजा पडलें असें म्हणतात.

भैरवपोलच्या थोडेसें पुढें गेलें कीं दुसरीं दोन स्मारकें दिसतात. त्यापैकीं एक जयमल्ल राठोड याचें आणि दुसरें पत्ता सिसोदिया याचें. पत्ता-प्रतासिंह अवघा सोळा वर्षांचा कोंवळा मुलगा होता, पण त्यानें वीर अभिमन्यूसारखा पराक्रम करून आपलें नांव चितोडच्या इतिहासांत अजरामर करून ठेवलें. पत्ताचें शौर्य अवर्णनीय होतें. मेवाडी लोकांचा तो फार आवडता होता.

अकबर जेव्हां दिल्लीच्या तख्तावर आला तेव्हांच त्यानें मनांत ठरविलें कीं, आपण वाटेल तेवढा पराक्रम केला आणि पुष्कळ देश जिंकले तरी जोपर्यंत चितोड जिंकणार नाहीं, तोंपर्यंत आपलें यश पूर्ण होणार नाहीं. निव्वळ याच लालसेनें आपलें वर्चस्व स्थापन करण्यासाठींच सन १५६७ मध्यें अकबरानें चितोडवर स्वारी केली. या वेळेस त्याच्याबरोबर अगणित सैन्य, मोठा तोफखाना आणि गजसेना होती. राजा तोडरमल्ल त्याचा सेनापति होता. अंबरचा राजा भगवानदासही त्याच्याबरोबर होता. चितोड हस्तगत करायचेंच अशा निश्चयानें जय्यत तयारीनिशी तो आला होता.

ऑक्टोबर २० तारखेपासून जानेवारी २३ तारखेपर्यंत वेढा पडलेला होता. यावेळीं उदयसिंह चितोडच्या सिंहासनावर होता. याच उदयसिंहाला त्याच्या दाईनें-पन्नानें—बनवीरापासून वांचविला होता. बनबीर हा उदयसिंहाचा चुलतभाऊ होय. पृथ्वीराजाचा तो दासीपुत्र होता. मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सांगाचा मुलगा विक्रमादित्य हा चितोडच्या गादीवर बसला, पण त्यानें गादीवर बसल्याबरोबर आपल्या पदरीं पुष्कळसे मल्ल ठेवून घेतले आणि कुस्त्यांच्या दंगलींत व शिकार करण्यांतच तो वेळ गमावूं लागला. पुढें बहादुरशहानें चितोडवर स्वारी केली वगैरे हकीकत मागल्या प्रकरणांत येऊन गेलीच आहे. राणी कर्णावतीच्या जोहारानंतर आणि हुमायुनानें बहादुरशहास हुसकावून लावल्यानंतर पुन: विक्रमादित्यच चितोडच्या गादीवर आला. पण त्याचें वर्तन पूर्वीसारखेंच बेदरकारीचें पाहून चितोडच्या सरदारांनीं त्याला पदच्युत करून बनवीरास गादीवर बसविला. मिळालेली गादी आपल्याला कायमचीच मिळाली पाहिजे असें बनवीरास वाटूं लागलें आणि त्यानें विक्रमादित्याचा सायंकाळच्या सुमारास खून केला. त्यानंतर विक्रमाचा धाकटा भाऊ उदयसिंह याला नाहींसा केल्याशिवाय चितोडचें राज्य आपल्याला निष्कंटक करतां येणार नाहीं असें वाटून, तीच विक्रमाच्या रक्तानें माखलेली तलवार घेऊन तो लहानग्या उदयला मारण्यासाठीं कुंवरपदका महालाकडे धांवला.

बनवीराला तसा कृतांतासारखा येतांना पाहून पन्नादाई समजली कीं हा उदयसिंहाला मारायलाच येत आहे. प्रसंगावधान राखून व चटकन् विचार करून तिनें उदयसिंहाच्या बिछान्यावर आपल्या स्वत:च्या मुलाला

निजवून उदयसिंहाला लपवून ठेवला. डोळ्यावर खुनाची धुंदी चढल्यामुळें वनवीराला कांहींच कळलें नाहीं व त्यानें पन्नाच्या मुलालाच उदयसिंह म्हणून ठार केला. आतां आपणास शत्रू राहिला नाहीं याच समाधानानें तो तेथून निघून गेला.

बनबीराचें हें कृत्य कोणत्याही सरदाराला आवडलें नाहीं तरी त्याचा कोणी प्रतिकार सुद्धां करूं शकलें नाहीं; इतक्या अल्पावधींत बनवीरानें हे दोन खून करून टाकले होते.

बनवीर गेल्यानंतर पन्नादाईनें उदयसिंहाला एका टोपलींत घालून वर फळापानांनीं झांकून एका विश्वासू बारी जातीच्या माणसाबरोबर गडाखालीं त्वरेनें पाठवून दिला व नंतर ती स्वतःही गडाखालीं गेली. पुढें उदयसिंहाला घेऊन ती बऱ्याच जागीं भटकली व शेवटीं कुंभलगडच्या किल्ल्यांत जाऊन तेथील महाजन आशादपुरा याला तिनें उदयसिंहाला ठेवून घेण्यास गळ घातली. प्रथम तर तो कबूल होईना, कारण बनबीराचें त्याला भय वाटत होतें. पण पन्नानें सांगितलें कीं, आपल्या निराश्रित राजाला आश्रय देण्याचें तुमचें कर्तव्य आहे. त्यालाही ती गोष्ट पटून अखेरीस त्यानें उदयसिंहाला आपल्याजवळ ठेवून घेतला आणि पन्ना परत चितोडगडावर गेली.

वनवीरानें आपलें आसन स्थिर केलें आणि नंतर तो चितोडच्या मोठमोठ्या सरदारांचा अपमान करूं लागला व वाटेल तसा वागूं लागला.

त्याच सुमारास उदयसिंह कुंभलगडावर आशादेपुराकडे आहे ही गोष्ट चितोडच्या सरदारांस कळली. उदयसिंह या वेळीं सोळा वर्षांचा

झाला होता. वनवीरावर नाराज झालेले सारे सरदार कुंभलगडावर एकत्र झाले आणि त्यांनीं उदयसिंहाला राजतिलक लावून चितोडचा राजा म्हणून जाहीर केलें.

नंतर वनवीराशीं युद्ध करण्यास सरदार चितोडकडे आले. वनवीर प्रथम तर लढाईला उभा राहिला, पण नंतर त्याची हार होऊन तो जो समरांगणांतून पळून गेला त्याचा पत्ताच लागला नाहीं. कोणी म्हणतात तो मारला गेला आणि कोणी म्हणतात तो कोठेंतरी पळून गेला.

उदयसिंह इ. स. १५३७ मध्यें गादीवर आला. त्यानंतर इ. स. १५६७ मध्यें बरोबर तीस वर्षांनीं अकबरानें चितोडवर स्वारी केली. या एवढ्या दीर्घ काळांत उदयसिंहाला आपला राज्यविस्तार करण्यास व आपल्या राज्याला बळकटी येईल अशा गोष्टी करून घेण्यास केवढा तरी अवकाश होता, परंतु दुर्दैवानें पूर्वीं होऊन गेलेल्या शूरवीर कर्तबगार पूर्वजांसारखें कर्तृत्व त्याच्या अंगीं नसल्यामुळें त्याला चितोडचें रक्षण करतां आलें नाहीं.

# प्रकरण ५ वें

अकबर जय्यत तयारीनें चितोडवर येत असल्याचें उदयसिंहाला कळतांच पुढें काय करावें हें त्याला सुचेना. कारण अकबराशीं युद्ध करण्याची तयारी त्याच्याजवळ कांहींच नव्हती व तेवढें आपल्याला सामर्थ्य नाहीं असेंच त्याला वाटत होतें. उदयसिंहानें आपले सारे सरदार-सामंत एकत्र बोलावून पुढें काय करावें म्हणून त्यांचा सल्ला विचारला. विचारांतीं असें ठरविण्यांत आलें कीं, उदयसिंहानें आपला परिवार घेऊन सुरक्षित अशा पहाडांत निघून जावें आणि ती गोष्ट उदयसिंहानें कबूल केली. लगेच उदयसिंह आपला परिवार घेऊन निघून गेला. दुसरा एखादा धैर्यवान् राजा असता तर तो अशा आणीबाणीच्या प्रसंगांत गेला नसता.

उदयसिंह गेल्यानंतर जयमल्ल राठोडास सेनापतिपद देण्यांत आलें. यावेळीं चितोडच्या खजिन्यांत फारसें द्रव्य नव्हतें, मनुष्यबळ देखील नव्हतें, आणि मोंगलांच्या जवळ अगणित द्रव्य व असंख्य सैन्य होतें. परंतु चितोडच्या वीरांच्या अंगीं पिढ्यानुपिढ्या सळसळणारें स्वातंत्र्याचें रक्त उसळत होतें. जयमल्लानें चार महिने किल्ला लढवून अकबरास जेरीस आणलें होतें. किल्ल्याच्या तटाच्या दुरुस्तीचें काम चाललेलें पहात जयमल्ल उभा होता, इतक्यांत शत्रूकडून आलेली एक बंदुकीची गोळी लागून त्याचा पाय निकामी झाला. तेव्हां कांहीं मंडळींनीं

सांगितलें, "तुम्ही थोडी विश्रांति घ्या." त्यावर तो म्हणाला, "विश्रांति? आतां विश्रांति कायमची रणभूमीवरच!" आणि दोन्ही हातांत तलवारी घेऊन कल्लाजी नांवाच्या एका धिप्पाड वीराच्या खांद्यावर बसून तो लढण्यास बाहेर निघाला.

कल्लानें सुद्धां दोन्ही हातांत तलवारी घेतल्यां होत्या. हे दोन वीर चार तलवारींनीं लढत होते. जयमल्ल अखेरीस मारला जाऊन पडला. थोड्याच वेळांत कल्लाचें शीर तुटून खालीं पडलें, पण डोक्याशिवाय त्याचें कबंधच आवेशानें लढत पुढें चाललें. सारे लोक आश्चर्यानें पहातच राहिले! तो लढत व शत्रुसेनेला मारीत साठ मैलांवरील रणढालपूर गांवाकडे आपल्या सासुरवाडीस निघाला. रणढालपुरास कृष्णा नांवाच्या मुलीशीं त्याचें लग्न ठरलें होतें. कृष्णेला सतीत्वाच्या प्रतापानें कल्ला येत असल्याचें कळलें. बापाची परवानगी घेऊन ती घोड्यावरून कल्लाकडे आली. चितोडच्या वेशीबाहेर कल्लाचें धड दोन हातांत तलवारी घेऊन येत होतें. कृष्णेनें घोड्याखालीं उतरून त्याच्या हातांतून तलवारी काढून घेतल्या व त्याला वरमाला घातली. त्याबरोबर तो खालीं पडला. कृष्णा त्याच्याबरोबर सती गेली. रणढालपुरांत या दंपतीची अजून पूजा होत असते. कल्लाच्या मंत्रानें विंचू-साप उतरतो म्हणतात.* कल्ला-संबंधानें थोडीशी अतिशयोक्ति असण्याचा संभव आहे. परंतु त्याचें कबंध लढून त्यानें पुष्कळ लोक मारले असतील व त्याची भावी वधू त्याच्याबरोबर सती गेली असेल एवढें खरें. शिवाजी महाराजांच्या वेळीं

* कल्लाची हकीकत श्री. गोविंदसिंह पंचौली यांच्या 'राष्ट्रतीर्थ' या पुस्तकावरून घेतली आहे.

मुरारबाजीचें कबंध असेंच लढत होतें म्हणतात.

याच जयमल्ल-कल्लाचीं स्मारकें भैरवपोलच्या पुढें आहेत. हल्लींचे बदनोरचे ठाकोर प्रतापसिंह यांनीं हीं स्मारकें करविलीं. कारण ते जयमल्लाचे वंशज होते. जयमल्ल–कल्ला पडतांच सोळा वर्षांच्या पत्ताला सेनापतिपद देण्यांत आलें. या वेळीं किल्ल्यांतील मनुष्यबळ तर पुष्कळच कमी झालें होतें, पण दाणागोटा देखील संपत आला होता. यापुढें फार वेळ किल्ला लढविणें शक्य नाहीं असें दिसून येतांच शेवटला उपाय जोहार करण्याचा ठरला. उदयसिंह गेला तरी त्याच्या नऊ राण्या आणि पांच मुली किल्ल्यांत होत्याच. राण्यांनीं जोहाराची तयारी केली. या वेळीं पंधरा हजार स्त्रियांनीं उदयसिंहाच्या राण्यांबरोबर अग्नींत देह जाळून घेतले! हा चितोडचा तिसरा जोहार अथवा साका होय.

जोहाराचा भडकलेला अग्नि किल्ल्याखालीं अकबराच्या सैन्याला दिसत होता. तो अग्नीचा लोळ पाहून अंबराधिपति भगवानदास अकबराला म्हणाला, “आतांच सांभाळलें पाहिजे. जोहार करून खवळलेले राजपूत वाघासारखे आपल्यावर तुटून पडतील.” खरोखरींच शूरवीर पत्तानें विलक्षण पराक्रम केला. पत्ता गजदळांत आवेशानें शिरला आणि त्यानें हत्तींचा संहार मांडला. अखेरीस तो थकून गेला, त्याचे हात चालेनात आणि ग्लानि येऊन तो खालीं पडला. तोंच एका हत्तीनें त्याला सोंडेंत धरून अकबरापुढें आणून टाकला. पत्ताच्या शौर्यानें अकबर चकित झाला. या चितोडच्या अभिमन्यूचा अशा रीतीनें शेवट झाला! अकबरानें दिल्लीस गेल्यानंतर पत्ता-जयमल्ल यांचे हत्तीवरील पुतळे करून आग्र्याच्या किल्ल्याजवळ ठेवले होते.

या लढाईंत अकबराचा विजय झाला खरा, पण त्याचें नुकसान देखील खूपच झालें होतें. त्यामुळें चिडून त्यानें चितोडच्या तीस हजार लोकांची कत्तल करविली आणि चितोडचें सातशें-आठशें वर्षांचें वैभव जमीनदोस्त करून टाकलें! अल्लाउद्दीनानें केला नसेल एवढा चितोडचा नाश अकबरानें करून टाकला! किल्ल्यावरील कांहीं मौल्यवान् वस्तू आपल्याबरोबर नेल्या, त्यांत सुंदर झुंबरें होतीं तींही नेलीं.

त्यानंतर उदयसिंहानें पिचोल्याच्या विस्तीर्ण सरोवराकांठीं उदयपूर शहर वसवून तिकडेच राजधानी केली. तेंच हल्लींचें उदयपूर होय. ज्याला इंग्रज लोक 'द सिटी ऑफ लेक्स' म्हणून म्हणतात त्या या उदयपूर शहरांत आणि शहराबाहेरसुद्धां अनेक लहानमोठीं सरोवरें आहेत. यांच्यामुळेंच मेवाड देश सुपीक व शोभादायक झाला आहे. जलानें तुडुंब भरलेलीं हीं सरोवरें पाहून प्रवाश्याचें मन आल्हादित होतें. हीं सरोवरें पाहण्यास पाश्चिमात्य देशांतील कितीतरी प्रवासी लोक इकडे येतात असें कळलें.

# प्रकरण ६ वें

तिसरा दरवाजा लागतो तो हनुमानपोल होय. नंतर चवथ्या दरवाजाचें नांव गणेशपोल आहे. इथें गणपतीची मूर्ति आहे. पांचव्या दरवाजाला जोडनपोल म्हणतात. हा दरवाजा डोंगराच्या चढाच्या वळणावर बरोबर गणेशदरवाजावर येतो. वरच्या दरवाजांतून खालचा दरवाजा दिसतो आणि खालच्या दरवाजांतून वरचा दरवाजा दिसतो. दोन्ही दरवाजे एकाखालीं एक असे येतात म्हणून याला जोडनपोल म्हणजे दुहेरी दरवाजे असें म्हणतात. त्यानंतरचा सहावा दरवाजा लक्ष्मणपोल नांवाचा येतो. येथें लक्ष्मणाचें मंदिर आहे. त्यानंतर शेवटला सातवा दरवाजा रामपोल येतो. येथें श्रीरामाचें लहानसें मंदिर आहे आणि हाच दरवाजा विशेष प्रसिद्ध आहे. याच दरवाजाच्या पुढें पत्ता सिसोदिया केवलावाला याच्या स्मारकाचा चवुतरा आहे. गेल्या प्रकरणांत ज्या पत्तासंबंधानें सांगितलें तोच हा होय. हा पत्ताजी हल्लींच्या आमेटच्या रावतांचा पूर्वज होता.

हे सारे दरवाजे चितोडचा पराक्रमी राजा राणा कुंभकरण यानें सन १४५० मध्यें करविले. हा राणा मोठा शूरवीर होऊन गेला. याच्यासंबंधानें पुढें थोडेंसें सांगण्यांत येईल.

चितोडचा राजवंश स्वतःला सूर्यवंशीय म्हणवितो. श्रीरामचंद्राचा पुत्र कुश हा त्यांचा मूळपुरुष असें ते मानतात. चितोडच्या

राजांनींही रामचंद्राच्या वंशाला शोभतील असेच पराक्रम करून दाखविले आहेत व आपल्या वंशाला धन्यता मिळविली आहे. चितोडच्या मातीच्या कणाकणांत आणि तसूतसू भूमींत तेजस्वी वीरांचा इतिहास भरून राहिला आहे.

रामपोल दरवाजांतून आमचे टांगे पुढें जातांच आम्ही येथें टांग्यांतून खालीं उतरलों. रामपोल दरवाजाचीं मोठमोठीं अजस्र कवाडें अजून चांगलीं आहेत. भाल्याचीं फाळें सर्व दरवाजाभर ठोकलेलीं आहेत, कारण पूर्वी दरवाजे तोडण्याला हत्तीकडून दरवाजावर टक्करा देववीत. परंतु हत्तींनीं दरवाजे तोडूं नयेत म्हणून अशीं अणकुचीदार भाल्याचीं फाळें दरवाजांत ठोकून बसवीत.

येथून पुढें आम्ही बहुतेक किल्ला चालूनच पाहिला. कारण प्रत्येक वेळीं टांग्यांत बसण्या-उतरण्याचाच जास्त त्रास होतो. श्री. पंचौली यांनीं टांगेवाल्यांना कुंभाच्या जयस्तंभाजवळ जाऊन विश्रांति घ्यायला सांगितले. गडावर जिकडे तिकडे हिरव्यागार वृक्षलतांची गर्दी दिसत होती. टांग्यांतून खालीं जमिनीवर पाऊल ठेवतांच आपण एका पवित्र व पुण्य भूमीवर पाय देत आहोंत असें मनांत वाटलें आणि 'पादस्पर्शं क्षमस्व मे' असें मनांतल्या मनांत त्या वंदनीय भूमीला म्हणून पुढें निघालों.

सिसोदिया घराण्याचा मूळपुरुष बाप्पा रावळ यानें स्वतःच्या बाहुबळावर मेवाडचें राज्य मिळविलें आणि पुढें सतत हजार-बाराशें वर्षें बाप्पाच्या तेजस्वी वंशजांनीं चितोडचें रक्षण केलें, साऱ्या जगाला दिपविलें, मोठमोठ्या रणधुरंधर वीरांना लोळविलें व दिल्लीपतींना कैक

वेळां पळविलें. त्याच चितोडच्या भूमीवर आम्ही आलों आहोंत आणि त्या भूमीचें दर्शन घेत आहोंत याचें एक प्रकारचें समाधान वाटूं लागलें.

चितोडसंबंधानें थोडासा मागचा इतिहास सांगण्यास हरकत नाहीं असें वाटतें. चितोडचा किल्ला कोणी बांधला हें निश्चित नाहीं. कोणी म्हणतात हा किल्ला पांडवांनीं बांधला. येथें एक भिमलत्ताकुंड आहे. त्यासंबंधानें अशी दंतकथा आहे कीं, धर्मानें जेव्हां राजसूय यज्ञ आरंभला तेव्हां या चित्रकुट पर्वतावर एक ऋषि रहात होता. त्याच्या-जवळ परिसमणि होता. तो मणि आणून त्याच्या साह्यानें द्रव्य मिळवावें असें भीमाला वाटलें आणि ऋषीजवळ येऊन तो मणि देण्यास त्यानें त्याला विनवून सांगितलें. तेव्हां 'एका रात्रींत जर तूं एक किल्ला येथें बांधून देशील तर मणी मी देईन' असें त्या ऋषीनें भीमाला सांगितलें. लगेच किल्ला बांधण्याचें काम भीमानें सुरूं केलें. रात्रीचे दोन प्रहर होऊन गेले आणि किल्ल्याचेही तिन्ही तट तयार झाले. थोड्याच वेळांत किल्ला पूर्ण होईल व परिस भीमास द्यावा लागेल असें ऋषीला वाटलें, पण परिस भीमास देण्याची त्याची इच्छा होईना. तेव्हां दुसऱ्या एका योग्याला आपल्या कटांत घेऊन त्यानें त्याला कोंबड्यासारखें ओरडायला सांगितलें. कोंबडा आरवलेला ऐकून पहांट झाली असें भीमास वाटलें आणि किल्ला कांहीं आपल्या हातून पुरा होत नाहीं असें पाहून भीमानें रागानें जमिनीवर लत्ताप्रहार केला. त्या जागेंत एक मोठा खाडा पडला, तेंच हें 'भीमलत्ताकुंड' म्हणून हल्लीं दाखवितात. वरील दंतकथेंत किती तथ्य असेल ते कोण जाणे, पण हा किल्ला फार प्राचीन आहे एवढी गोष्ट खरी असली पाहिजे.

# प्रकरण ७ वें

चित्रकुट पर्वत असें पूर्वी या डोंगराला म्हणत आणि चित्रांग राजा येथें पूर्वी राज्य करीत होता. चित्रकुटाचें अपभ्रंशानें चितोड झालें. सातव्या शतकांत चितोडवर मानसिंह मोरी ( मौर्य ) प्रमारवंशी राजा राज्य करीत होता. त्याच्याजवळून बाप्पा रावळानें चितोड जिंकून घेतलें.

रावळवंशाला प्रथम गोहील म्हणत. पूर्वी पांचव्या शतकांत सौराष्ट्र—हल्लींचें काठियावाड—येथें वल्लभीपुर म्हणून शहर होतें आणि या शहरीं शिलादित्य राजा राज्य करीत होता. यवनांनीं वल्लभीपुरावर स्वारी केली, त्यांत शिलादित्य मारला गेला. त्या वेळीं शिलादित्याची पत्नी पुष्पावती माहेरीं गेली होती. शिलादित्यावर संकट आलेलें ऐकून ती वल्लभीपुरास यायला निघाली. पण अर्ध्या वाटेंतच शिलादित्याचा अंत झाल्याचें तिला कळलें. यवनांच्या भयानें पुढें न जातां राणी तिच्या विश्वासू मैत्रिणीबरोबर एका गुहेंत गुप्तपणें राहिली. तेथेंच तिला मुलगा झाला. गुहेंत जन्मल्यामुळें त्या मुलाचें नांव गुह, गोहिल उर्फ गुहादित्य असें पडलें. गोहिलाचा जन्म इ. स. ५६६ हा मानण्यांत आला आहे.

गोहिल बालपणापासून मोठा शूर व साहसी होता. पुढें मेवाडच्या दक्षिणेस हल्लींच्या ईडर संस्थानाच्या जंगलांत भिल्ल लोकांत मिसळून

तो राहूं लागला. त्याचें शौर्य पाहून यालाच आपला राजा करावा असें भिल्लांना वाटूं लागलें. वृद्ध झालेल्या भिल्लराजानें खुषीनें गोहिलाला आपला राजा करण्याचें कबूल केलें. गोहिलानें पुढें त्या भिल्लराजाचा वध करून स्वतः राज्य बळकावलें. हें त्याचें कृत्य चांगलें नसलें तरी राज्यलोभानें मनुष्य काय करील हें सांगतां येत नाहीं.

गोहिलाच्या आठव्या पिढीपर्यंत ईडरवर गोहिलांचाच अम्मल होता. परंतु नंतर नागादित्य गोहिल याला भिल्लांनीं ठार मारून पुनः आपलें राज्य घेतलें. या वेळीं नागादित्याचा तीन वर्षांचा अल्पवयी मुलगा शैलाधीश—यालाच कालभोज किंवा बाप्पा म्हणत—भिल्लांच्या भयानें कांहीं स्वामीभक्त सेवकांनीं भांडेरच्या किल्ल्यांत आणून ठेवला. परंतु ती जागाही सुरक्षित नाहीं असें दिसतांच नागेंद्रनगरा (हल्लींचें नागदा शहर) जवळील त्रिपुट पर्वतावरील दाट जंगलांत त्याला लपवून ठेवलें. या त्रिपुट पर्वतावर कांहीं नागर ब्राह्मण होते, त्यांच्यांतच ब्राह्मण म्हणून बाप्पा राहूं लागला.

उदरनिर्वाहाला बाप्पाला ब्राह्मणांच्या गाई चाराव्या लागत. त्या गाईंत एक गाय अशी होती कीं, ती संध्याकाळीं घरीं परत येतांना कुठें तरी दूध देऊन येई. गाईच्या मालकाला वाटे बाप्पाच दूध पिऊन जात असावा. तेव्हां बाप्पानें त्या गाईवर पाळत ठेवली. तो दुसरे दिवशीं तिच्या मागेमागें हिंडूं लागला. गाई घोर जंगलांत शिरली. बाप्पाही तिच्यामागें होताच. पाहतों तर एका जागेवर उभी राहून ती जमिनीवर दुधाच्या धारा सोडूं लागली. त्यानें जवळ जाऊन पाहिलें. त्या जागेवर एक शिवलिंग होतें आणि थोड्याच अंतरावर एक योगी ध्यानस्थ बसलेला होता. तें शिवलिंगच त्यांचें कुलदैवत एकलिंगजी होय आणि

तो योगी हारीतमुनि होय. बाप्पानें नंतर त्या दिवसापासून त्या मुनींची सेवा सुरू केली. पुढें बाप्पाला हारीतमुनि प्रसन्न झाले. त्यांच्याचमुळें बाप्पा अजिंक्य झाला असें म्हणतात.

बाप्पा पंधरा वर्षांचा असतांना एकदां असें झालें कीं, तो अरण्यांत गाई चारीत होता. ते दिवस वसंतऋतूचे होते. नागेंद्रनगराचा राजा सोलंकी याची मुलगी आपल्या मैत्रिणी बरोबर घेऊन त्याच अरण्यांत झुलनोत्सवासाठीं आली होती. पण झोंपाळा बांधायला दोर पाहिजे तो आणायला विसरून गेली होती. त्या मुलींना मोठी पंचाईत पडली आतां झोंपाळा कसा बांधायचा? इतक्यांत गाई चारीत असलेल्या तरुण बाप्पाला त्यांनीं पाहिला. झोंपाळा बांधून देण्यास त्यांनीं बाप्पाला सांगितलें. पण कांहींतरी चेष्टा करावी म्हणून तो म्हणाला, "राजकन्येनें माझ्या-बरोबर फेरा फिरला पाहिजे तरच बांधून देईन." मुलींना काय कोणी-कडून तरी झोंपाळा बांधून हवा होता, त्यांनीं ती गोष्ट कबूल केली. राजपूतांत लग्नाच्या वेळींच वधूवर असे फेरे फिरत असतात.

मुलींचा खेळ पुरा होऊन त्या निघून गेल्या. परंतु पुढें जेव्हां राजकन्येचें लग्न करण्याची वेळ आली, तेव्हां सोलंकी राजानें ज्योतिषाला तिची पत्रिका दाखवून तिचें लग्न कधीं होईल म्हणून विचारलें. तिचे ग्रह पाहतांच या मुलीचें पूर्वींच लग्न होऊन चुकलें आहे असें ज्योतिषानें राजाला सांगितलें. राजाला आश्चर्य वाटलें व या गोष्टीचा तपास त्यानें सुरू केला. हें वर्तमान चोंहीकडे पसरलें आणि बाप्पालासुद्धां कळलें. राजाच्या भयानें बाप्पा तेथून पळून गेला.

बाप्पा चितोडला मानसिंह मोरी याच्याकडे गेला. मानसिंहानें

त्याला आपल्याजवळ ठेवून घेतला व त्याच्या अंगचे गुण आणि पराक्रम पाहून त्याला एक लहानसा सामंत केला. मानसिंहाची बाप्पावर फार मर्जी असलेली पाहून दुसऱ्या सरदारांस वैषम्य वाटूं लागलें. पुढें जेव्हां महमंद बीन कासीम हा पुष्कळ सैन्य घेऊन चितोडवर चालून आला तेव्हां मानसिंहाचे सरदार कोणीही लढाईवर जायला तयार होईनात. ते मानसिंहावर आधींच रागावलेले होते. ते म्हणूं लागले, "आतां बाप्पालाच धाडा." बाप्पा लढाईला सिद्ध होताच. या वेळीं बाप्पानें अतिशय पराक्रम करून महमंद कासीमला थेट गझनवीपर्यंत हांकून लावला. बाप्पाच्या शौर्यतेजानें इतर सारे सरदार आतां त्याच्यावर खूष झाले आणि बाप्पाला साह्य करून मानसिंहाला मारून चितोडच्या सिंहासनावर बसविण्यास त्यांनीं त्याला मदत केली. इ. स. ७२८ पासून चितोडच्या सिंहासनावर रावळ वंशाची सत्ता चालूं झाली.

बाप्पा रावळ चितोडच्या सिंहासनावर आल्यापासून मेवाडचा एकसारखा उत्कर्षच होऊं लागला. बाप्पाला १३० मुलें होतीं. सोलंकी राजाच्या मुलीशीं त्याचें लग्न तर झालें होतेंच, पण त्याशिवाय आणखी पुष्कळ राण्या त्याला होत्या. हारीतमुनींच्या आशीर्वादानें आपल्याला राज्य मिळालें अशी बाप्पाची दृढ भावना होती. तो मोठा शिवोपासक होता. सारें राज्य शिवाला अर्पण करून, एकलिंगजीचा स्वतःला दिवाण म्हणवून तो राज्यकारभार करूं लागला. अद्यापि सुद्धां उदयपुरचे राणा स्वतःला एकलिंगजीचे दिवाण म्हणवून घेतात.

बाप्पाच्या मागून चितोडच्या सिंहासनावर जे राजे आले ते सारेच एकापेक्षां एक असे शूरवीर होते. बाप्पानंतर पांचवा राजा खुमान

दुसरा हा अत्यंत पराक्रमी होता. यानें अरबांना चोवीस वेळां हांकून लाविलें होतें. याला सिझर म्हणत. चितोडच्या इतिहासांत खुमानचें स्थान उच्च आहे.

बाप्पापासून रणसिंह उर्फ कर्ण हा तेहतिसावा राजा होय. सातव्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत जेवढे राजे चितोडच्या गादीवर आले तेवढे पराक्रमीच निघत गेल्यामुळें या राजांनीं वेळोवेळीं परकीयांच्या होणाऱ्या हल्ल्यापासून मेवाड देशाचें रक्षण केलें. एवढेंच नव्हे तर पुढें मध्यहिंदुस्थानांत परकी लोकांचा शिरकाव होऊं दिला नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

सुमारें अकराव्या शतकाच्या अखेरीस रणसिंहापासून चितोडच्या राजांच्या दोन शाखा झाल्या. गुहिलपासून बाप्पापर्यंत गोहिल वंश सुरू होता, पण बाप्पापासून रावळ वंश सुरू झाला आणि रणसिंहाची पिढी बाप्पापासून तेहतिसावी होय. जो वंश चितोडच्या गादीवर होता तो स्वतःला रावळच म्हणवीत होता, परंतु रणसिंहाचा धाकटा मुलगा राहप यानें सिसोदा या गांवीं निराळें राज्य स्थापून तो आपल्याला सिसोदिया म्हणवूं लागला. हा राहप फार शूर होता. मंदराधिपती राणा राजमुकुल याला जिंकून त्याच्याच राजधानींत राहपानें त्याला कैद करून ठेवला होता. राजमुकुलानें आपला गदडवा प्रांत व राणा ही उपाधि राहपास देऊन आपली मुक्तता करून घेतली. तेव्हांपासून सिसोदिये स्वतःला राणा म्हणवूं लागले.

इकडे चितोडच्या रावळ वंशाचा अल्लाउद्दीनानें नाश करून टाकल्यामुळें राणा वंशांतील अरीसिंहाचा मुलगा हम्मीरसिंह यालाच

२००३
[२९]

त्या वेळीं चितोडच्या गादीवर असलेल्या अजयसिंहानें आपल्यामागें गादीचा वारस केला आणि हम्मीरापासून पुढें चितोडच्या सिंहासनावर राणा वंशाचें राज्य सुरू झालें.

बाप्पाच्या बेचाळीसाव्या पिढींत रत्नसिंह हा चितोडच्या गादीवर असतांना त्याचा भाऊ शुभकर्ण नेपाळांत गेला व त्यानें तेथें वेगळें राज्य स्थापलें. तोच त्याचा वंश नेपाळच्या गादीवर आहे.

अजयसिंहानें त्याच्या मुलांना म्हणजे सज्जनसिंह व खेमसिंह यांना राज्य न देतां वडील भावाचा मुलगा हम्मीरसिंह याला राज्य दिल्यामुळें ते दोघे रुसून दक्षिणेकडे निघून गेले. त्यांच्यापैकीं सज्जनसिंहाच्या वंशांतच महाप्रतापी श्रीशिवाजीमहाराजांचा जन्म झाला !

अशा रीतीनें प्रतापी बाप्पापासूनच मोठमोठे रणधुरंधर वीर जन्मास येऊन त्यांनीं स्वतःच्या बाहुबळावर अनेक राज्यें स्थापन केलीं. आणि राजपूतांत बाप्पा रावळ याला जो अग्रपूजेचा मान मिळतो, तो याच कारणामुळें होय. सातव्या शतकांत बाप्पा रावळाचा जन्म झाला नसता तर त्या वेळेपासूनच हिंदुस्थानाला पारतंत्र्याच्या शृंखलांत जखडावें लागलें असतें असें राजपूतांच्या इतिहासावरून आढळून येतें.

# प्रकरण ८ वें

चितोड म्हटलें कीं चितोडचा इतिहास आलाच. आणि चितोड पाहायला जायचें म्हणजे तरी काय, तेथले जुने अवशेष पाहायला व तेथल्या वीरांच्या रोमांचकारी कथा ऐकायलाच जायचें नाहीं का ? आम्ही दौलताबादचा किल्ला पाहिला. तो दुर्भेद्य असून खूप मोठा आहे, तेथले जुने अवशेष पाहण्यासारखे आहेत, तेथल्या वीरांच्या कथा रोमांचकारी आहेत, पराक्रमी यादवांनीं स्वातंत्र्यासाठीं पराकाष्ठा केली होती. परंतु चितोडसंबंधानें कांहींतरी निराळीच भावना मनाला वाटूं लागते. आपल्या हिंदुस्थानांत कैक राज्यें अशीं होऊन गेलीं कीं तेथल्या स्वाभिमानी व पराक्रमी वीरांनीं शत्रूंना धूळ खायला लावली असेल; परंतु चितोडच्या राजपूत वीरांच्या संबंधानें मनावर कांहींतरी विलक्षण परिणाम होतो. निदान मला तरी तसें वाटूं लागलें खरें. बाप्पा रावळ-पासून चितोडच्या वंशांत बहुतेक सारेच राजे मोठे स्वदेशभक्त व पराक्रमी होऊन गेले. आणि ही परंपरा अव्याहत आठशें वर्षेंपर्यंत तरी कायम होती. नाहींतर बाप शूर असला तर मुलगा भेंकड असतो, आणि मुलगा पराक्रमी निघाला तर त्याचा बाप मूर्ख असतो; असाच एकंदर अनुभव येतो. पुढें पुढें चितोडची सुद्धां तीच अवस्था झाली, पण कांहीं काळ तरी तेथील पराक्रमी राजांनीं आपला राजवंश धन्य केला होता.

किल्ल्यावर उतरल्यावर प्रथम आम्ही पाताळेश्वर महादेवाच्या मंदिरांत गेलों. हें मंदिर इ. १४६६ मध्यें राणा कुंभ यानें केव्हांतरी बांधलें. मंदिर अजून चांगल्या स्थितींत आहे. दगडी कोरीव नक्षीकाम सुंदर आहे. बुद्धाच्या कांहीं कोरलेल्या मूर्ती व फुटक्या तुळ्या येथें पडलेल्या आहेत. त्या केव्हांच्या असाव्यात हें नक्की सांगतां येत नाहीं.

या मंदिरापासून थोडेसें चालून गेलें कीं, तोफखान्याची इमारत लागते. येथें पुष्कळ तोफा आहेत, पण त्यांत एक राजबाण व दुसरी दुष्मनभंजन. या तोफा फार जुन्या वेळच्या आहेत असें कळलें. कोणत्या राजानें करविल्या तें मात्र कळलें नाहीं. याच जागेंत दारूचें कोठार असून बंदुका वगैरे आहेत.

येथून जवळच एक पडकी इमारत आहे. आला काबरा नांवाच्या एका नगरशेठाची होती. आलाकाबऱ्याच्या इमारतीचा अवशेष तरी आहे, पण उदारधि मंत्री भामाशाच्या इमारतीचें नांवनिशाण सुद्धां नाहीं. तोही याच चौकांत राहात होता म्हणतात. महाराणा प्रतापसिंहाच्या वेळीं या वाणी जातीच्या भामाशहानें आपलें सारें द्रव्य देशासाठीं दिलें होतें.

राणा प्रताप अकबराशीं युद्ध करून अगदीं जेरीस आला होता. पुढें तर सैन्यखर्चासाठीं त्याच्याजवळ यत्किंचितही द्रव्य राहिलें नाहीं. अशा परिस्थितींत सैन्यखर्च भागणें शक्य नाहीं असें जाणून आपला प्रिय देश सोडून कुठेंतरी घोर कंदरांत जाऊन राहण्याचा त्यानें निश्चय केला. राण्यानें आपला मुक्काम सुद्धां हलविला, पण तितक्यांत भामाशहा येऊन पोंचला आणि महाराण्याला नमस्कार करून हात जोडून म्हणाला, "आपण देश सोडून जाऊं नका. माझें सारें धन मी देतों, आणि

आपण सैन्याचा पगार चुकता करा."

प्रथम ती गोष्ट राण्याला मान्य होईना. तेव्हां डोळ्यांत पाणी आणून तो म्हणाला, "माझें धन चितोडचेंच धन आहे. चितोडरक्षणाकडेच त्याचा खर्च होणार असल्यामुळें आपल्याला दोष लागणार नाहीं. नाहींतरी परकीयांच्या घरांत जाण्यापेक्षां या धनाच्या उपयोगानें आपण देशाचें स्वातंत्र्य राखूं शकाल."

राण्याला भामाशहाचा युक्तीवाद पटला. त्याचें धन घेऊन राण्यानें सैनिकांचें थकलेले पगार चुकते केले व दुसरेंही आणखी सैन्य ठेवलें. पुढें महाराणा अकबराशीं लढत राहिला. वाणी जात कंजूष असते असें आपण ऐकतों, परंतु भामाशहाचें औदार्य केवढें होतें पहा! या उदार दात्याजवळ त्याच्या मरणसमयीं एकही पैसा राहिला नव्हता, ही गोष्ट खरी सुद्धां वाटणार नाहीं. त्यानें आपलें सारें द्रव्य स्वदेशकार्याला अर्पण केलें होतें. पण चितोडच्या इतिहासांत त्याचें नांव अजरामर झालें. 'धन्य तो महात्मा!' असें उद्गार सहज मनांत उठतात.

तोफखाना पाहून आम्ही निघालों. वाटेंतच महाराणा कुंभाचा खजिनदार अगर भंडारी बेला यानें सन १४४९ मध्यें बांधलेलें जैन शांतिनाथाचें मंदिर लागलें. बादशाही हल्ल्यांत मधल्या मूर्तीचा विध्वंस झालेला आहे. येथून जवळच नौलखाभंडार अर्थात् खजिन्याची जुनी इमारत आहे. ही इमारत सोळाव्या शतकांत बनवीरानें बांधविली होती, पण आतां पडून गेलेली अशी दिसते. 'नौलखा' म्हणजे 'नऊ लाख' असा बोध होतो; पण खरा अर्थ 'नलखा' म्हणजे 'न पाहिलेला' असा आहे. कोणी पाहिलें नसेल एवढें धन यांत असावें म्हणून 'नौलखा' म्हणत

९९०

असतील, पण आतां मात्र दगडवीटांच्या राशी शिल्लक राहिलेल्या आहेत.

तोफखान्यापुढें आणखी कांहीं अंतरावर चालून गेलें कीं एक मोठी थोरली पडकी इमारत लागते. या इमारतीच्या एका भागांत नवीन कमानी केलेल्या दिसल्या. ही इमारत चितोडचा प्रतापशाली महाराणा कुंभकरण अगर कुंभा याची आहे. यानें चितोडवर कितीतरी नव्या इमारती, देवळें, तळीं, विहिरी वगैरे करविल्या. मेवाडच्या राण्यांत राणा कुंभाचेंच स्थान उच्च आहे. कुंभाच्या या महालांत अनेक गुप्त मार्गही आहेत. एक भुयार आम्ही पाहिलें. या भुयारांतून सासबहूच्या कुंडापर्यंत एक गुप्त रस्ता आहे. पूर्वीं सासू आणि सून दोघीही कुंडावर स्नानास जातांना या भुयारमार्गानेंच जात आणि वेगवेगळ्या कुंडांतून स्नान करीत. त्या कुंडांनाच सासबहुका कुंड हल्लीं म्हणतात. या महालाच्या प्रवेशद्वाराचें नांव सूर्यपोल असें आहे. या दरवाज्यांतून तटाकडे लागलेले जे दरवाजे आहेत, त्यांत तिसरा दरवाजा जो हनुमानपोल तेथपर्यंत गुप्त भुयारमार्ग आहे असें म्हणतात. संकटकालीं या मार्गाचा उपयोग होत असावा असें वाटतें. हल्लीं मात्र तो मार्ग आहे किंवा नाहीं हें कळत नाहीं. सासबहुका कुंडाकडे जाणारें भुयार मात्र दिसतें.


सूर्यपोलाजवळ चितोडच्या राजवंशाचें सूर्यांकित तांबडें निशाण उंच आकाशांत फडकत असे. एके काळीं वैभवशिखरावर विराजत असलेला तोच महाल आज आपल्या प्रतापी मालकाच्या स्मृतीचें चिह्न म्हणूनच शिल्लक राहिला आहे—जणूं गतस्वामीसाठीं विलाप करून जमिनीवर मस्तक टेकून पडून राहिला आहे !

# प्रकरण ९ वें

कुंभाचा हा महाल एके काळीं मोठ्या ऐश्वर्यानें ताठ उभा होता, पण आतां त्यांतला एकही भाग शाबूत असा नाहीं. कांहीं नुसत्याच भिंती उभ्या आहेत, तर कांहीं जागीं दगडविटांच्या राशी पडलेल्या दिसतात. जिथें कितीतरी माणसें वावरत असतील, संपत्तीचीं भांडारें भरलेलीं असतील, हजारों वीर जमा होऊन राणा कुंभाच्या आज्ञा ऐकत असतील, तेथें चोंहीकडे शुकशुकाट नि मोडतोड दृष्टीस पडते आणि मनाला एक प्रकारची उद्विग्नता वाटल्याशिवाय राहत नाहीं.

राणा कुंभ मोठा मुत्सद्दी-राजकारणी पुरुष होऊन गेला. तो मोठा विद्वान् आणि शौर्यशाली होता. त्याचप्रमाणें तो चांगला संगीतज्ञ व मार्मिक पंडित होता. तो उत्तम कवि असून त्याची वाणी रसाळ होती. संगीतशास्त्रावर त्यानें संगीतराज, संगीतमीमांसा वगैरे ग्रंथ रचले. जयदेव कवीच्या अष्टपदीवर रसिकप्रिया नांवाचा टीकाग्रंथही त्यानें लिहिला. त्यानें कांहीं नाटकें देखील लिहिलीं असून शिल्पशास्त्रावर तज्ज्ञ अशा शिल्पशास्त्रज्ञांकडून त्यानें ग्रंथ लिहविले. त्या वेळीं कुंभासारखा विद्वान्, गुणी आणि पराक्रमी राजा कुठेंही नव्हता.

कुंभासंबधानें बोलतांना आपण त्याचा चुलता चुंडा उर्फ चंद्रसिंह याचा थोडा इतिहास पाहूं. चुंडा हा चितोडचा भीष्म होय. इ. स. १३८२ मध्यें चितोडच्या सिंहासनावर लक्ष्मणसिंह उर्फ लाखाराणा



राणा कुंभाचा महाल ( पृष्ठ ३४ )

राण्याला लढाईवर जाण्याचा प्रसंग आला. तेव्हां आपण लढाईंत पडल्यास या अज्ञान मुलाचें व त्याच्या आईचें काय होईल असा विचार राण्याच्या मनांत आला. परंतु चुंडानें बापाच्या समक्ष आपला छोटा भाऊ मुकुळजी याला सिंहासनावर बसवून आपण त्याला राजोचित मान देऊन म्हणाला, "आजपासून हा चितोडचा राजा असून मी त्याचा एक सरदार राहून चितोडची सेवा करीन." म्हाताऱ्या लाखाराण्याला जसा हर्ष झाला तसेंच वाईटही वाटलें. कारण चुंडा खरा उत्तराधिकारी असून त्यानें राज्यत्याग करावा हें त्याला मान्य नव्हतें, पण खऱ्या राजपूताप्रमाणें त्यानें आपला शब्द खरा केल्याचा आनंदही त्याला वाटल्याशिवाय राहिला नाहीं.

महाभारतांत शंतनूराजासाठीं भीष्माचार्यांनें राज्यत्याग करण्याची प्रतिज्ञा करून जशी पाळली, तशीच या राजपूत भीष्मानेंहि आपली प्रतिज्ञा पाळून आपला शब्द खरा केला होता. थोड्याशा कारणांसाठीं भावाभावांत भांडणें होतात, तंटे होतात, ते एकमेकांचे वैरी होतात, अशीं कितीतरी उदाहरणें आपल्याला आढळतात. चुंडानें मेवाडराज्याचा त्याग केला ही गोष्ट सोपी नाहीं. त्यानें अशीही शपथ घेतली कीं, मीच काय पण माझे वंशजसुद्धां मेवाडच्या सिंहासनाचा अभिलाष धरणार नाहींत; आणि खरोखरींच त्याचे वंशज जे पुढें चंदावत नांवानें प्रसिद्धि पावले त्यांनीं एकनिष्ठपणानें मेवाडची सेवा केली, पण राज्याचा अभिलाष केला नाहीं. सालुंब्रा हा मेवाडांतील मुलुख चुंडाला देण्यांत आला. अजूनही सालुंब्रयाला चुंडाचे वंशज चंदावत आहेत.

इ. स. १४२१ मध्यें राणा मुकुल हा गादीवर पांचव्या वर्षीच

बसला आणि सन १४३३ मध्यें वयाच्या सतराव्या वर्षी तर त्याचा खून झाला! त्याच्या आजाचे दोन दासीपुत्र होते--एकाचें नांव मेरा व एक चाचा. यांनीं तो देवपूजा करीत असतांना दोन्हीकडून येऊन त्याचा वध केला. त्याच्या मृत्यूनें सारा मेवाड दुःखी झाला. मेरा-चाचा पळून गेले होते. मुकुलचा अल्पवयी मुलगा कुंभ याला गादीवर बसविण्यांत आलें व त्याचा आजा रणमल्ल राज्यकारभार पाहूं लागला. परंतु चितोडच राज्य स्वतःच बळकवावें असें रणमल्लास वाटूं लागलें. रणमल्ल कांहीं कामासाठीं मारवाडांत गेला असतां कुंभाचा चुलता राघवदेव याच्या सल्ल्यानें तो राज्यकारभार करूं लागला. कुंभानें प्रथम मेरा-चाचा यांना शासन करावयाचें ठरविलें. कारण कुंभ वयानें लहान होता तरी प्रखर बुद्धीचा आणि पराक्रमी होता. कुंभ आपल्याला शासन करायला येत आहे असें कळताच मेरा-चाचा शृंगपर्वतांतील दुर्गम जागीं जाऊन राहिले. पण कुंभ तेथेंही गेला. चिडलेल्या कुंभापुढें मेरा-चाचा यांचें कांहींच चालेना. शेवटीं कुंभाच्या सेनेनें त्या दोघांना ठार केलेंच. पण चाचाचा मुलगा एका आणि त्याचा नातलग महपा तेथून निसटून माळव्याच्या सुलतानाकडे आश्रयाला गेले.

एकाचा पक्ष घेऊन माळव्याचा सुलतान कुंभाशीं लढाईला आला. सारंगपुरानजीक मोठी लढाई होऊन सुलतान त्यांत हारला आणि मांडूच्या किल्ल्यांत पळून गेला, नंतर एका गुजरातकडे पळून गेला. पण कुंभाच्या भयानें त्या सुलतानानें त्याला आश्रय दिला नाहीं. शेवटीं तो कुंभाला शरण गेला. नंतर त्याचेवर दया करून कुंभानें त्याला आपल्या राज्यांत ठेऊन घेतला.

कुंभ राघवदेवाच्या सल्ल्यानें राज्य करीत असलेला पाहून

रणमल्लानें गुप्तपणें राघवदेवाचा खून करविला आणि सारी सत्ता आपल्या हातीं घेण्याचा प्रयत्न चालविला. राघवदेव मोठा धार्मिकवृत्तीचा न्यायी पुरुष होता. तो अत्यंत देखणा व साऱ्या मेवाडचा आवडता होता. त्याच्या मरणानें सारा मेवाड दुःखी झाला आणि सारे रणमल्लाला शिव्याशाप देऊं लागले. रणमल्लानें आपले सारे मारवाडी मोठमोठ्या जागेवर नेमून सिसोदियांना वरच्या जागेवरून काढून टाकलें. आजाचें हें कृत्य कुंभास पसंत नव्हतें. त्यानें आपला चुलता चंद्रसिंह (चुंडा) याला आपल्या मदतीला बोलावला. कारण कुंभाच्या आजीनें—हंसाकुमारीनें—चुंडाला राज्याबाहेर घालवून दिला होता. चितोडच्या रक्षणाला चुंडा लगेच आला व त्यानें रणमल्लाचा वध करून चितोडला लागणाऱ्या ग्रहणापासून देशाचें रक्षण केलें.

रणमल्लाचा मुलगा जोधराव चुंडावर चालून आला, पण त्यानें त्याला थेट मारवाडांत हांकून देऊन कुंभाचा अंमल तेथें बसविला व एक्का सिसोदिया याला तेथला अधिपति नेमला. जोधरावानें चुंडाशीं संधि करून त्याला आपला कांहीं मुलुखही दिला. याच जोधरावानें जोधपूर वसविलें.


# प्रकरण १० वें

कुंभानें आपल्या चुलत्यास—चुंडास—बोलावून स्वतःचा आजा रणमल्ल याला देहांत शासन दिलेलें पाहून समस्त मेवाड देश आनंदून गेला. कारण साऱ्या मेवाडला चुंडाविषयीं आदर होता आणि राघवदेव तर त्यांचा आवडताच होता. मेवाडचे यापूर्वीं जेवढे म्हणून राजे होऊन गेले त्यांत कुंभाच विशेष पराक्रमी व राजकार्यनिपुण होता. नाहींतर एकादा राजा शूर असला तरी मुत्सद्दी नसणार आणि मुसद्दी असला तर तेवढा पराक्रमी नसणार असें होतें. परंतु कुंभ सर्वच गुणांनीं मंडित होता.

इ. स. १४३३ पासून सन १४३९ पर्यंतच्या सात वर्षांच्या काळांत कुंभानें इतका दरारा बसविला कीं, माळवा, दिल्ली आणि गुजरात या सुलतानांना त्याची चांगलीच दहशत बसली. कुंभानें माळव्याच्या सुलतानाचा पराभव करून त्याला चितोडवर कैद सुद्धां करून ठेवला होता. त्याचें वर्तन जशास तसें असें होतें. त्यानें मुसलमानांच्या मशिदी जागजागीं पाडून टाकल्या, त्यांच्या स्त्रिया कैद केल्या आणि मुसलमान सुलतान हिंदूंचा छळ करून त्यांच्यावर अत्याचार करीत त्याचें उट्टें तो काढीत असे. त्यामुळें त्याचा दरारा चांगलाच बसून गेला. त्याला अनेक पदव्या मिळाल्या होत्या. ‘हिंदुसुरत्राण’ ही पदवी त्याला मिळाली. कुंभाला अन्याय मुळींच सहन होत नसे.

इ. स. १४५६ मध्यें माळव्याचा सुलतान व गुजरातचा सुलतान यांनीं आपसांत बेत ठरवून कुंभाचा धुव्वा उडवून देण्याचें ठरविलें, पण कुंभ कांहीं कच्च्या दिलाचा नव्हता. ती गोष्ट त्याला कळली आणि ते दोघे एकत्र होऊन आपल्यावर चाल करून येण्यापूर्वींच त्यानें एकएकट्याला गांठून दोघांचाही चांगलाच समाचार घेतला. या जयामुळें त्याच्या पूर्वींच्या कीर्तींत अधिकच भर पडली आणि त्याला अनेक पदव्या मिळाल्या. त्यापूर्वीं राणांना फक्त महाराणा म्हणत, पण कुंभाला महाराजाधिराज, महाराणा, ही पदवी मिळाली शिवाय रायराय, राणेराय, महाराणा ही पदवी व त्याबरोबर, राजगुरु, दानगुरु, चापगुरु, हिंदु-सुरत्राणा वगैरे अनेक पदव्या मिळाल्या.

या विजयाचें स्मारक म्हणून चितोडगडावर कुंभानें एक सुंदर जयस्तंभ उभारला. हा जयस्तंभ म्हणजे वास्तुशास्त्राचा एक सुंदर नमुना आहे. आम्ही प्रत्यक्षच हा स्तंभ जेव्हां पाहिला, तेव्हां खरोखरींच या स्तंभाची जी कीर्ति ऐकली होती ती खरी वाटली. शेवटल्या मजल्यापर्यंत आम्ही जाऊन आलों. या स्तंभाला एकंदर नऊ मजले आहेत. थेट वरपर्यंत १५७ पायऱ्या आहेत. उंची १२० फूट असून रुंदी ( घेर ) ३० फूट आहे. जमिनीपासून पांच-सहा फूट उंच अशा चबूतऱ्यावर हा बांधलेला आहे. या स्तंभातून जिन्यावर चढूं लागलें कीं, कुठेंच अंधार न येतां थेटपर्यंत सारखा प्रकाश मिळेल असे झरोके ठेवलेले आहेत, आणि आंतल्या बाजूला सुंदर नक्षीदार कोरीव काम आहे. चौथ्या मजल्यापासून देवतांच्या मूर्तीं कोरलेल्या दिसतात. यांत ब्रह्मा, सावित्री, लक्ष्मीनारायण, शिवपार्वती व रामसीता, नंतर सहा



कुंभाचा जयस्तंभ (पृष्ठ ४०)

ऋतू, मग गंगायमुनादि नद्या, वरुण-यम-अग्नि वगैरे देव व पांडव-द्रौपदी अशा मूर्ती थेटपर्यंत असून प्रत्येक मूर्तीखालीं नांवें कोरलेलीं आहेत. या मूर्ती पाहतां पाहतां आपण शेवटल्या मजल्यावर केव्हां पोंचलों हें कळत सुद्धां नाहीं. दिल्लीचा कुतुबमीनारा पाहिला आहे, पण त्यावर जसजसें वर चढावें तसतशा पायऱ्या तोकड्या आणि अंधार येतो, त्यामुळें वर चढणाराला घेरी आल्यासारखें भासतें, तसें इथें वाटत नाहीं.

आपल्या इतिहासांत हिंदु राजांच्यावर एक आरोप ठेवण्यांत येतो. तो असा कीं, त्यांनीं मोठमोठे पराक्रम केले, अनेक देश जिंकले, पण कलाकौशल्याची निर्मिति केली नाहीं. खरें पाहतां परकीयांशीं झगडतांना त्यांना अशा गोष्टींकडे दृष्टि द्यायला वेळच कुठें होता? पण राजा कुंभानें मात्र हा जयस्तंभ अत्यंत कलापूर्ण बनविला आहे. प्रत्यक्ष जयस्तंभच पाहिल्याशिवाय खात्री होणार नाहीं. दुसरा एक कलापूर्ण महाल म्हणजे जयपुरचा अंबरमहाल होय. अंबरमहाल म्हणजे हिंदु कलाकौशल्याचा एक उत्कृष्ट नमुना आहे. त्याचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं.

या स्तंभाच्या वरच्या मजल्यावर वीज पडून वरचे छप्पर तुटून गेलें होतें, पण स्वर्गवासी महाराणा स्वरूपसिंह यांनीं पुन्हां तें दुरुस्त करविलें. त्याचप्रमाणें खालचा कांहीं भाग तुटला होता, त्याची दुरुस्ती कै. महाराणा फत्तेसिंह—हल्लींचे महाराणा भूपालसिंह यांचे वडील—यांनीं करविली. या स्तंभाची राज्याकडून चांगली काळजी घेण्यांत येते. वरच्या मजल्यावरून आसपासचें दृश्य मोठें मनोरम दिसतें. किल्ल्यालगतची सपाट जमीन, दुरदूरच्या अरवलीच्या लहानमोठ्या टेकड्या आणि

किल्ल्याच्या पायथ्याशीं, मातेच्या कुशींत निर्भयपणें आश्रय घेत असलेल्या बालकासारखी चितोडपुरी !

चितोडचें स्टेशन जवळ येऊं लागतांच आपली दृष्टि एकदम किल्ल्यावर पडते. परंतु त्यांतल्या त्यांत गगनाशीं स्पर्धा करणाऱ्या या स्तंभाकडे पहिल्याप्रथम आकर्षिली जाते. हा जयस्तंभ माथें उंच करून गर्वभरानें जगाकडे पहात आहे असें वाटतें. वारा, पाऊस आणि उन्हांत सतत उभा राहून आपल्या पराक्रमी व तेजस्वी राजाचा जिवंत इतिहासच तो जगाला सांगत आहे असें वाटूं लागतें.

जेव्हां प्रथमच हा जयस्तंभ नजरेस पडला, तेव्हां जवळ जाऊन आपण केव्हां पाहूं असें मला होऊन गेलें होतें. जयस्तंभावरून सारा प्रदेश पाहून मनाला समाधान वाटलें, पण राणा कुंभाच्या पडक्या महालाकडे पाहून मात्र वाईटही वाटलें. ज्यानें हा जयस्तंभ इतका कलापूर्ण बांधला त्याचा महालही किती कलापूर्ण व वैभवांत नांदत असेल; पण तोच आज मेल्यासारखा पडला आहे असें मनांत आलें.

राणा कुंभानें नवीन बत्तीस किल्ले बांधले, त्यांत कुंभलगडचा किल्ला सर्वांत मजबूत आहे. त्या शिवाय सुंदर सुंदर देवालयें, तळीं, विहिरी इत्यादि कितीतरी त्यानें करविल्या. याच गडावरचें कुंभश्यामचें मंदिरहि कुंभानेंच बांधलें. त्याबद्दल पुढें येईलच.

बाप्पा रावळ नंतर चितोडची अर्थात् मेवाडची जी एकसारखी भरभराट होत होती, त्यांत कुंभाच्या वेळीं तर हें मेवाडचें वैभव कळसास पोंचलें होतें. कुंभ हा अष्टपैलू पुरुष होता. पण अखेरीस या गुणी राजाला उन्मादरोग झाला आणि राज्यलोभानें प्रत्यक्ष त्याच्याच मुलानें

—उदयसिंहानें—त्याचा खून केला. बापाच्या खुनानें कलंकित झालेल्या अधमाला चितोडच्या स्वामीभक्त व देशभक्त सरदारांनीं गादीवर बसूं दिलें नाहीं. त्याला राज्याबाहेर हद्दपार करण्यांत आलें. पुढें माळव्याकडे पळून जात असतां वाटेंतच अंगावर वीज पडून तो मरण पावला. अजूनही ‘हत्यारा ऊदा’ म्हणूनच तो ओळखला जातो.

नंतर कुंभाचा दुसरा मुलगा जयमल्ल याला सिंहासनावर बसविण्यांत आलें. कुंभाच्या महालांत आम्ही गेलों आणि कुंभाच्या आजापासूनचीच हकीकत सांगायला सुरवात केली. पण कुंभाचें एकंदर चरित्रच तसें उद्बोधक आहे आणि चितोडच्या किल्ल्यावर गेल्यानंतर तेथला जुना इतिहास नव्यानें सांगण्यांत, वीरांच्या कथा ऐकण्यांत आणि जुने अवशेष पाहण्यांत आपल्या समक्षच त्या त्या गोष्टी घडत आहेत असा भास होऊं लागतो.

कुंभाच्या महालाच्या आतां पडक्या भिंतीच उरल्या आहेत. पण या भिंतींत सुद्धां कुंभाच्या कारकिर्दीचा सारा इतिहास सांठविलेला आहे असें वाटायला लागतें. कुंभाच्या महालानंतर एक दरवाजा लागतो. याला बडी पोल म्हणतात. हा पूर्वीं मागील दरवाजा होता, पण आतां किल्ल्याकडे जाणें-येणें याच दरवाज्यांतून होत असल्यामुळें हेंच प्रवेशद्वार असावें असें वाटतें.

इ. स. १८८४ मध्यें सज्जनसिंह महाराणा यांनीं कुंभाचा महाल दुरुस्त करण्याचें मनांत आणून पूर्वेच्या बाजूला ज्या दगडी कमानी आहेत त्या उभारल्या, पण नंतर त्यांच्या मृत्यूमुळें तें काम तसेंच अर्धवट राहिलें आणि त्या नंतर फत्तेसिंह महाराणा यांनीं नवीन धर्तीचा असा फत्तहप्रकाश नांवाचा महाल बांधला आहे.

कुंभाच्या महालाच्या दक्षिणच्या बाजूला राजकुमारांचा महाल आहे. हाही महाल आतां पडून गेलेला असून अर्धवट भिंती कांहीं जागीं आपलें अस्तित्व दाखवीत आहेत एवढेंच. या महालांत पन्नादाईनें उदयसिंह राजकुमाराचा जीव वांचविण्यासाठीं स्वतःच्या मुलाचा बळी बनवीराच्या तलवारीला दिला.

चितोडचे राजे जसे तेजस्वी आणि देशभक्त होऊन गेले, तसेच चितोडचे सेवक स्वामीभक्त व देशभक्त होते. आणि म्हणूनच चितोडचा इतिहास ऐकतांना एकदम मनांत उद्गार येतो, "धन्य चितोड आणि धन्य राजपूत वीर!"

# प्रकरण ११ वें

गडावर पोंचल्यानंतर आमचे टांगे पूर्वीच जयस्तंभाकडे पाठवून दिले होते. घोडे व टांगेवाले विश्रांति घेत होते. आम्ही कुंभाचा महाल आणि जयस्तंभ पाहून सासबहूच्या कुंडाकडे निघालों. या जयस्तंभाजवळच मेवाडी शेतकऱ्यांच्या झोंपड्या व बरींच घरें दिसलीं. त्याचप्रमाणें दगडी खलबत्ते घेऊन बरीच लहान मुलें बसलीं होतीं. चितोड स्टेशनवर, उदयपुरास वगैरे हे खलबत्ते फार महाग मिळतात. इथें त्यापेक्षां अर्ध्या किंमतीला मिळाले.

थोडा वेळ इथें बसून विश्रांति घ्यावी असें वाटलें, पण अजून कितीतरी भाग पाहायचा बाकी होता. मग आमच्या पार्टींतील ज्या एकाला फोटो घ्यायची आवड होती त्यानें आम्हांला सर्वांना उभे राहायला सांगून फोटो घेतले. आम्ही मागें दौलताबादचा किल्ला पाहायला गेलों होतों तेव्हां वर जातांना बरोबर चाकू, पेन्सील वगैरे कांहीं नेऊं नये अशी सक्त ताकीद असे; नव्हे, दारावरचा पहारेकरी त्या वस्तू काढून आपल्याजवळ ठेवीत असे. पण इथें मात्र तसा प्रकार नाहीं. आपण पाहायला जाणार तिथें कांहीं नासधूस करायला का जाणार असतों ?

या दिवसांत इकडे काकड्या खूप पिकतात. चांगली हातभर लांब काकडी दिडकीला मिळते. इकडे सारे लोक या काकड्या सपाटून खातात. गरीबगुरीब भाजी सुद्धां काकडीचीच खातात. आम्हीही एका

शेतकरी छोकऱ्याला काकड्या आणायला पाठवून दिला. सासवहूचीं कुंडें पाहून आल्यानंतरच त्यांचा समाचार घ्यायचा होता. किल्ल्यावर सीताफळांचीं सुद्धां खूपच झाडें होतीं व सीताफळें अगदीं खचून लागलेलीं होतीं. पण अजून कच्चीं असल्यामुळें त्यांचा कांहीं उपयोग नव्हता.

जयस्तंभाच्या पायऱ्या उतरून खालीं आलें कीं आणखी थोडेसें डाव्या बाजूला दोन-तीन पायऱ्या उतरून जावें लागतें. ही जोहारभूमि होय असें कळलें. चितोड किल्ल्यावर मोठमोठे असे तीन जोहार अगर साके झालें असें इतिहासावरून कळतें. पहिला साका राणी पद्मिनीच्या वेळीं झाला तो याच जागेंत होय. इ. स. १३०३ मध्यें अल्लाउद्दीनानें पद्मिनीच्या प्राप्तीसाठीं चितोडवर स्वारी केली होती हें इतिहासप्रसिद्ध आहेच. अखेरचा उपाय म्हणून पद्मिनीनें पंधरा हजार स्त्रियांबरोबर अग्नींत जाळून घेतलें होतें. या भुवनसुंदर व सती स्त्रीसंबंधानें इतिहासांत खरी हकीकत पुरेशी उपलब्ध नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें. कारण कोणी तिला राणा भीमदेवाची पत्नी म्हणतात व कोणी तिला राणा रत्नसिंहाची पत्नी म्हणतात. त्याचप्रमाणें तिचें एकही चित्र, प्रतिमा कांहींच नाहीं. तिचा हल्लीं जो महाल पद्मिनीचा महाल म्हणून आहे तेथें तिच्या वेळची कांहींच स्मृति शिल्लक नाहीं. फक्त जमीन तेवढी आहे. त्याच जागेवर महाराणा सज्जनसिंह यांनीं नवीन दगडी भिंती बांधलेल्या आहेत. या महालालगत एक सुंदर तलाव पण आहे. तलावांतही एक छोटासा महाल असून होडींतून तेथें जातां येतें.

अल्लाउद्दीनानें चितोडचा विध्वंस केला, परंतु पद्मिनीचा महाल मात्र तिच्या स्मृतीसाठीं तसाच ठेवला होता. पुढें दुसऱ्या कोणीतरी चितोडचा सर्वस्वीं नाश केला तेव्हां हा महालही पाडून टाकला असावा. राणी पद्मिनीच्या गोष्टीवरून तिच्या असाधारण स्वरूपाची कल्पना येते, पण त्याबरोबरच तिच्यामुळें चितोडच्या वैभवाचा, वीरांचा केवढा नाश झाला याबद्दल खेदही वाटतो! तिच्याबरोबर पंधरा हजार स्त्रियांचा होम झाला होता!

'अति सर्वत्र वर्जयेत्' हेंच खरें. पद्मिनी अत्यंत सुंदर होती म्हणून तिला जळून मरावें लागलें; राणाकुंभ अत्यंत बुद्धिमान् होता, म्हणून त्याला उन्मादरोग झाला; आणि राणा प्रताप अत्यंत स्वदेशप्रेमी होता, म्हणून त्याला जन्मभर रानावनांत भटकावें लागत होतें! चितोडच्या इतिहासांतच या गोष्टी आपल्याला दिसून येतात.

राणा कुंभाच्या महालांत एक विवर अर्थात् भुयार आहे. त्यांतच हे जोहार झाले असें म्हणतात. पण तें शक्य दिसत नाहीं. कारण, एवढ्याशा कोंडलेल्या जागेंत पंधरा-पंधरा हजार स्त्रिया राहणेंच शक्य नाहीं. तेव्हां या उघड्या जागेंतच जोहार झाला असला पाहिजे असें वाटतें.

दुसरा जोहार इ. स. १५३४ मध्यें झाला. त्या वेळीं राणी कर्मवती उर्फ करणावती हिनें तेरा हजार स्त्रियांसुद्धां जोहार केला. ही गोष्ट तिसऱ्या प्रकरणांत येऊन गेलीच आहे. हा जोहार मात्र या भूमीवर झाला नाहीं. ती जागा दुसरी असून हल्लीं त्या जागेला महासतीस्थान असें म्हणतात. चितोडचें तिन्ही साके वेगवेगळ्या भूमीवर झालेले आहेत.

तिसरा साका तर उदयसिंहाच्या वेळेसच झाला. ज्यानें कुंभाचा खून केला तो हात्यारा उदा हा नव्हे. उदयसिंह राणा सांगा उर्फ संग्रामसिंह याचा मुलगा होय व यानेंच हल्लीचे उदयपूर शहर वसविलें आहे. कुंभाचा मुलगा रायमल्ल कुंभानंतर गादीवर बसला. रायमल्लास अनेक मुलें होतीं; परंतु मोठा पृथ्वीराज, नंतर जयमल्ल व मग संग्रामसिंह उर्फ सांगा हेच इतिहासप्रसिद्ध होऊन गेले. कारण राज्यप्राप्तीसाठीं या तिघा भावांत नेहमीं कलह उत्पन्न होई. सांगा पृथ्वीराजाला म्हणे, "तुझ्यापेक्षां मी व्यवहारदक्ष आहे, तेव्हां मलाच मेवाडचें राज्य करूं दे." ती गोष्ट मानी पृथ्वीराजास रुचण्यासारखी नव्हतीच. या भावांत होत असलेले तंटे पाहून बिचारा रायमल्ल कंटाळून गेला होता. पुढें या तिघांनीं असें ठरविलें कीं भीमलगांवच्या पुजारणीस विचारून राज्य कोणाला मिळणार याचा निकाल करून घ्यावा. कारण या पुजारणीच्या तोंडून भविष्यकाळचे शब्द निघत व ते खरे होत.

तिघांना ती गोष्ट मान्य झाली. प्रथम पृथ्वीराज व जयमल्ल गेले व देवीसमोरील बिछायतीवर जाऊन बसले. नंतर सांगा आला. बिछायतीवर जागा नसल्यामुळें जवळच्याच व्याघ्रचर्मावर तो बसला. थोड्याच वेळांत त्यांचा काका सूरजमल्ल आला, तोही सांगाजवळ व्याघ्रचर्मावर फक्त गुडघे टेकून बसला. नंतर ती पुजारीण आली आणि 'कां आलांत?' म्हणून तिनें विचारलें. हकीकत कळल्यावर ती सांगाकडे पाहून म्हणाली, "व्याघ्रचर्मावर बसणारालाच सिंहासन मिळेल व सुरजीकाकाला थोडासा अंश मिळेल."

झालं! तिघा भावांत लढाईच सुरू झाली. एका बाजूला पृथ्वीराज

व जयमल्ल, दुसरीकडे सांगा आणि सुरजमल्ल. या लढाईंत पृथ्वीराजाला व सुरजमल्लाला बऱ्याच जखमा झाल्या. सांगाचा एक डोळा गेला, जखमाही झाल्या. तो तेथून निसटला. लढाई करण्यापेक्षां राज्य नको असें सांगाला वाटलें. तो मेवाडांतून दूर निघून गेला.

ही गोष्ट राणा रायमल्ल याला कळतांच पृथ्वीराजाची त्यानें खूप निर्भर्त्सना केली. " तूं भ्रातृद्रोही आहेस, मला तोंड दाखवूं नकोस " म्हणून म्हणाला. पृथ्वीराजाला आपल्या कृत्याची लाज वाटून तो कुंभलगडाकडे चालता झाला.

आतां जयमल्लच सर्वाधिकारी झाला होता. पण पुढें असें झालें कीं, राव सुरताण सोलंकी याची रूपवती मुलगी आपल्याला मिळावी म्हणून त्यानें सुरताणाला निरोप पाठविला. तो म्हणाला, " माझ्या मुलीनें 'होय' म्हटलं तरच मी ही गोष्ट कबूल करीन. " जयमल्लास सुरताणाचा राग आला नि तो त्याच्याशीं लढाईला निघाला. जयमल्ल येत आहे असें कळतांच सुरतान आपलें कुटुंब घेऊन पळून जाऊं लागला. पण जयमल्ल अगदीं पाठीवरच येऊन ठेपला, तेव्हां त्या मुलीचा मामा रत्नसिंह जयमल्लाकडे जाऊन म्हणाला, "मी तुम्हांला शरण आहे. हा माझा मुजरा घ्या." आणि बरछी त्याच्या पोटांत खुपसून त्यानें त्याचा प्राण घेतला. नंतर जयमल्लाच्या लोकांनीं रत्नसिंहाला तेथेंच ठार केला.

पृथ्वीराजाला जयमल्लाच्या मृत्यूची खबर लागून सुरताणच्या मुलीच्या सौंदर्याची माहिती झाली. लागलींच तो सुरताणाकडे गेला व त्याच्या मुलीला त्यानें मागणी घातली. त्या मुलीला पृथ्वीराजाशींच लग्न करायचें होतें, तेव्हां सुरताणानें त्यांचें लग्न करून दिलें. पुढें पृथ्वी–

राजाच्या बहिणीचा नवरा राव जगमल यानें पृथ्वीराजाला कपटानें विष देऊन त्याचा प्राण घेतला. पृथ्वीराजाची बायको त्याच्याबरोबर सती गेली.

# प्रकरण १२ वें

अशा रीतीनें या दोघा भावांचा शेवट होऊन सांगाचा मार्ग मोकळा झाला. सांगा जिवंत आहे ही गोष्ट वृद्ध रायमल्लास कळतांच त्यानें त्याला बोलावून आणलें. सन १५०९ मध्यें रायमल्ल मृत्यु पावला व सांगा राज्याधिकारी झाला. राणा सांगा अत्यंत शूरवीर व धाडशी होता. साऱ्या मेवाडच्या लोकांना त्याच्याबद्दल आदर वाटत असे. तो गादीवर येतांच मेवाडमध्यें त्यानें पुष्कळच सुधारणा केल्या, अनेक देश जिंकले व अनेक लढाया मारल्या. प्रतिस्पर्धि असा त्याला कोणी राहिलाच नव्हता असें म्हटलें तरी चालेल. परंतु दिल्लीपति बाबर मात्र त्याचा मोठा शत्रू होता. बाबरला महाराणा सांगा एवढा दुसरा कोणीच शत्रू नव्हता, आणि सांगाला जिंकल्याखेरीज हिंदुस्थानांत आपला जम बसणार नाहीं हें बाबर पुरतें जाणून होता.

बाबरानें अगदीं जय्यत तयारी करून चितोडवर स्वारी केली. सांगाही स्वस्थ बसला नव्हता. बाबराला सामना देण्यासाठीं त्यानें सुद्धां चांगलीच तयारी केली. ही लढाई इ. स. १५२७ मध्यें झाली आणि ही खानव्याची लढाई म्हणून प्रसिद्ध आहे. या लढाईचा शेवट दुर्दैवानें सांगाच्या बाजूचा झाला नाहीं. सांगा जखमी होऊन बेशुद्ध पडला असतांना, त्याच्या सरदारांनीं त्याला रणांगणावरून उचलून दूर नेलें. राणा सांगाचा या वेळीं पराभव झाला.

सांगा राणा जेव्हां शुद्धीवर आला तेव्हां त्याला कळलें कीं, आपल्याला रणांगणावरून काढून आणलें आहे. आपला पराभव झाला ही गोष्ट सांगाच्या मनाला फार लागली व बाबराला जिंकल्याशिवाय चितोडवर पाय ठेवायचा नाहीं अशी त्यानें प्रतिज्ञा केली. परंतु ती त्याची प्रतिज्ञा पुरी होण्यापूर्वींच त्याच्या साथीदारानें त्याला विषप्रयोगानें ठार केलें, कारण हा जिवंत राहिला तर पुनः लढाईचा प्रसंग येणार अशी त्याला भीति पडली होती.

सांगा मोठा शौर्यशाली होता. त्याच्या अंगावर लहानमोठ्या ऐंशी जखमा होत्या. एक डोळा पूर्वींच गेला होता आणि एक हातही निकामी झाला होता. परंतु शत्रूला मात्र त्याचा विलक्षण दरारा होता. इब्राहिम लोदी, मुजफरशहा, महंमदशहा यांना तर त्याचा फारच धाक वाटत असे. बाबरला दैव अनुकूल झालें म्हणूनच खानव्याच्या लढाईंत त्याला जय मिळाला. बाकी आपणाला विजय मिळेल किंवा नाहीं याची त्याला शंकाच वाटत होती. सांगा जर जगला असता तर त्यानें बाबरला चांगलाच हात दाखविला असता.

राजपूत इतिहासांत राणा सांगाचेंही स्थान फार वरचें आहे. याच्या अमदानींत परकीयांच्या स्वाऱ्यांवर स्वाऱ्या राजस्थानावर होत होत्या. सिंध, पंजाब, बंगालकडे मुसलमान सरदार स्वतंत्र होऊन बसले होते. दक्षिणेकडे विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर, बेदर, वऱ्हाड हीं स्वतंत्र मुसलमानी राज्यें होतीं. सांगाचाच समकालीन कृष्ण देवराव हा आपलें स्वातंत्र्य राखून होता. तोही सांगासारखाच बलाढ्य होता. वरील सर्व राजांत सांगाच आपल्या शौर्यतेजानें तळपत होता. बाहेरच्या शत्रूशीं

त्याला लढावें लागे आणि त्याच्याच वेळेपासून चितोडच्या राज्यांत अंत:कलह पेट घेऊं लागल्यामुळें सांगाला तिकडेही लक्ष पुरवावें लागत होतें. याच संधीस जलालुद्दीन बाबर यानें हिंदुस्थानांत आक्रमण करून आपल्या साम्राज्याचें बीजारोपण केलें.

सांगा नुसताच पराक्रमी नसून कट्टा हिंदु धर्माभिमानी होता. राणा कुंभासारखीच त्याची राजनीति होती. दोनशें मशिदी त्यानें तोडून टाकल्या होत्या. त्याचें उत्पन्न दहा कोटींचें होतें. सुमारें एक लक्ष खडें सैन्य त्याच्या पदरीं होतें. त्याशिवाय त्याच्या हाताखालीं सात राजे, नऊ राव आणि एकशें चार सरदार त्याचा हुकूम झेलायला तयार होते. यावरून त्याचें वैभव, दरारा व बल कळून येण्यासारखें आहे. तो बुद्धिमान्, न्यायप्रिय, वीर, उदार व क्षमाशील होता. त्याच्या उदार वृत्तीचें एक उदाहरण देण्यासारखें आहे. लढाईंत त्याचा एक डोळा गेला होता, एक हात तुटला होता. व एक पाय देखील निकामा झाला होता. तो आपल्या सरदारास म्हणाला, "राजा अव्यंग असावा असें आपल्या शास्त्रांत आहे आणि मी तर असा व्यंग असलेला! तेव्हां तुम्हांला वाटेल तो राजा तुम्ही सिंहासनावर बसवा, मी त्याच्या हाताखालचा सरदार होऊन देशाची सेवा करीन." ही गोष्ट कोणींच कबूल केली नाहीं, पण यावरून त्याचें औदार्य आणि स्वदेशप्रेम कळून येतें.

चितोडच्या किल्ल्यावर राणा सांगाचें कांहींच जयचिह्न वगैरे नाहीं. राणा कुंभानें ठिकठिकाणीं नांव घेण्यासारख्या कृती करून ठेवल्या आहेत. त्या हल्लीं जरी पडूनझडून गेल्या असल्या तरी पावलोपावलीं

कुंभाचीं स्मृतिचिह्नें दृष्टीस पडतात. पण सांगाचें एक मंदिर तेवढें स्मृतिचिह्न आहे. त्याला ‘ सांगा राणाका देवरा ’ म्हणतात.

सांगानंतर त्याचा मुलगा रत्नसिंह गादीवर बसला. हाही बापाप्रमाणें शूर होता पण थोडासा गर्विष्ठ होता. त्यानें लोकांना सांगितलें कीं, “ दरवाजे उघडे ठेवून खुशाल निजा. शत्रू कसा येतो तें मी पाहतों. ” परंतु दुर्दैवानें घरच्या भांडणांत या वीराचा लवकरच अंत झाला.

नंतर सांगाचा दुसरा मुलगा विक्रमादित्य गादीवर बसला. याच्याच वेळीं बहादुरशहानें चितोडवर स्वारी केली व सांगाची पत्नी राणी कर्मवतीनें तेरा हजार स्त्रिया समवेत जोहार केला तो दुसरा साका म्हणून प्रसिद्ध आहे.

त्यानंतर तिसरा साका झाला तो सांगाचा धाकटा मुलगा उदयसिंह ज्याच्या वेळीं अकबरानें चितोडवर आक्रमण केलें तोच हा होय. चवथ्या प्रकरणांत उदयसिंहासंबंधानें लिहिलेंच आहे. मिळून चितोड किल्ल्यावर जे तीन जोहार झाले त्यांत एकंदर चाळीस-पन्नास हजार स्त्रियांच्या देहाची राख होऊन गेली आणि त्यांच्याबरोबर किती मौल्यवान् रत्नांचा नाश झाला असेल तें सांगवत नाहीं ! कारण राजपूत या रमणीरत्नांच्या बरोबरच आपलें मौल्यवान् जवाहीरसुद्धां हातानें नाश करून टाकीत. इतकी त्यांना तीव्र निराशा होई आणि नंतर ते मरायलाच बाहेर पडत.

परंतु भुयारांत जोहार करीत ही गोष्ट शक्य वाटत नाहीं. भुयारावर इमारती आहेत त्या तुटून फुटून गेलेल्या असल्या तरी एवढी मोठी प्रचंड चिता पेटल्यावर इमारती वर राहणेंच शक्य नाहीं.

इ. स. १८८२ मध्यें महाराणा सज्जनसिंह यांनीं या भुयारांत ज्या अस्थी टाकल्या होत्या त्या काशीस पाठविल्या असें म्हणतात.

# प्रकरण १३ वें

जोहारस्थानापासून पुढें गेलें कीं खालीं उतरावें लागतें. उतरायला चांगल्या पायऱ्या आहेत. आठ-दहा पायऱ्या उतरून गेलें कीं एक नवीनच बांधलेलें देऊळ आहे. या देवळांत अजून मूर्तीची स्थापना केलेली नव्हती. नंतर चांगली फरसबंदी जागा आहे आणि पुनः खालीं कुंडापर्यंत उतरून जायला आणखी आठ-दहा पायऱ्या आहेत. हीं दोन कुंडें शेजारींशेजारींच आहेत. एकांत सासू व एकांत सून अशा दोघी राजघराण्यांतील स्त्रिया स्नान करीत असत असें म्हणतात. वरच्या डोंगरांतून पाण्याची पन्हाळ बांधून कुंडांत पाणी सोडलेलें आहे. पाणी अगदीं स्वच्छ आहे. डोंगरांतूनच हा झरा सतत वाहत असल्यामुळें पाणी वाहतें आहे. पुढें याच कुंडापर्यंत राणा कुंभाच्या महालांतून भुयार मार्ग आहे.

आम्हांला केव्हांपासून तहान लागलेलीच होती. कुंडांत वरून पाणी येत होतें, त्यांतून पाणी घेऊन सर्वांनीं तहान भागविली. थोडा वेळ इथेंच बसण्याची सर्वांना इच्छा झाली. उन्हाची वेळ होती तरी येथलें सृष्टिसौंदर्य मनाला आल्हाद वाटेल असें आहे. सायंकाळीं अगर प्रातःकाळीं तर किती आराम वाटेल असें मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं. एका बाजूला उंच पहाड, दुसरीकडे जयस्तंभाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पायऱ्या, खालीं स्वच्छ पाण्यानें भरून वाहत असलेलीं कुंडें.

कांहीं मेवाडी स्त्रिया कपडे धूत होत्या व कांहीं मेवाडी पुरुष कुंडांत पोहत होते. मोठे मनोरम चित्र दिसत होतें तें !

थोडा वेळ विश्रांति घेऊन आम्ही वर गेलों आणि जयस्तंभाच्या जवळच झाडाखालीं बसलो. काकड्या मागविल्या होत्या त्या घेऊन मेवाडी छोकरा आलाच होता. इथें उन्हाचा त्रास मुळींच होत नव्हता, इतकी गर्द छाया झाडांची पडलेली होती. काकड्या खातांना गप्पा चालूच होत्या आणि माहितीही होत होती. कारण आमच्याबरोबर आलेले श्री. पंचौली व श्री. नागर हेडमास्तर चितोडसंबंधानेंच बोलत होते. आम्ही बरेच दमलों होतों. उन्हांतून चालल्यामुळें त्या वेळीं ती काकडी इतकी रुचकर लागली कांहीं सांगायला नको. त्यामुळें त्या मोठमाठ्या काकड्या केव्हांच संपून गेल्या.

अजून वर बरेंच पाहायचें होतें म्हणून आम्ही उठलोंच. आतां टांग्यांत बसून निघालों रस्त्यांतच एक हत्तीकुंड लागतें. यांत पूर्वीं जेव्हां चितोडला राजधानी होती तेव्हां हत्ती जलविहारासाठीं येत असत असें कळलें.

हत्तीकुंडाच्या थोडेसें पुढें गेलें कीं एक पुराणी विहीर येते. या विहिरींत कौमुदी खूप फुलतात म्हणे, पण आम्हांला मात्र दिसल्या नाहींत. कदाचित् या दिवसांत बहर नसेल. या विहिरीला 'कातण-बाव' किंवा 'जेतूकी बावडी' म्हणतात. या विहिरीसंबंधानें असें कळलें कीं, ही विहीर जेतू नांवाच्या एका वैश्य स्त्रीनें बांधविली. जेतूनें हातानें सूत कांतून आणि ते विकून त्या पैशांतून ही विहीर करविली. विहीर बांधण्याइतके पैसे सूत कातून मिळविणें सोपें नाहीं. यासाठीं जेतूनें

किती कष्ट केले असतील याची कल्पनाच करावी. ही विहीर म्हणजे सुंदर वाव आहे. विहीर बांधणें किती तरी खर्चाचें काम असतें, त्यांतून वाव बांधायची म्हणजे जास्तच खर्च येतो. मनुष्यानें मनांत आणलें तर तो वाटेल तें करूं शकतो एवढें मात्र या जेतूच्या वावडीवरून कळलें.


या वावेपासून जवळच जयमल्ल राठोड व पत्ता यांच्या हवेल्या अर्थात् महाल आहेत. मागें पांचव्या प्रकरणांत जयमल्ल व पत्ता यांच्यासंबंधींची हकीकत येऊन गेली आहे. जयमल्लाचे वंशज हल्लींचे बदनोरचे ठाकोरसाहेब यांनी जयमल्लाचा महाल दुरुस्त करण्यासाठीं उदयपूर सरकारची परवानगी मागितली आहे आणि ती त्यांना मिळाली आहे असें कळलें. कारण गडावर कांही करावयाचें असलें तर उदयपूर सरकारची परवानगी अवश्य पाहिजेच.

पत्ताच्या महालांत कंकाली मातेचें मंदिर आहे. या महालांतील अस्मानी रंगाचें काम शेकडों वर्षांचें जुनें असलें तरी सुंदर आहे असें कळलें. या महालाजवळच एक मोठा तलाव आहे. याला 'पत्ताजीका तालाव' असें म्हणतात.

पत्ताजीच्या महालाच्या पुढें थोडेसें जावें लागतें. नंतर पुन: एक कुंड लागतें. याला सूर्यकुंड म्हणतात. हें कुंड फार प्राचीन आहे म्हणतात. केव्हा कोणीं केलें तें समजत नाहीं. पण या कुंडासंबंधाने इकडे अशी दंतकथा आहे कीं, रणांगणावर जातांना चितोडचे राजे प्रथम या कुंडांत स्नान करीत. या कुंडासमोरच एक मोठें देवालय आहे. यांत पूर्वीं सूर्यदेवाची मूर्ति होती. स्नानानंतर सूर्याला अर्घ्य देऊन मग वरील देवळांत जाऊन सूर्याला वंदन करून विजयप्राप्तीसाठीं

प्रार्थना करीत आणि अशीही प्रतिज्ञा करीत की 'जय मिळाला नाही तर या कुंडांत प्राणविसर्जन करीन.' त्यांच्या प्रतिज्ञेचा सूर्यालासुद्धा धाक वाटायचा की काय कोण जाणे, अशी प्रतिज्ञा करून निघालेला राजा विजयमाला घेऊनच परत येत असे. पण पुढे मात्र एका देशद्रोह्याच्या दुष्टबुद्धीमुळें ही गोष्ट त्याच्याकडून शत्रूला कळली आणि मुसलमान शत्रूने या कुंडांत गोमांस आणून टाकलें. त्यामुळें हें कुंड दूषित होऊन त्याचा पूर्वींचा पवित्रपणा नष्ट झाला असें समजून पुढच्या राजांनी या कुंडांत लढाईला जाण्यापूर्वी स्नानास जाण्याचें बंद केलें. लढाईत चितोडच्या राजांना अनेक वेळां पराजित व्हावें लागलें आणि या कुंडाचें महत्त्व देखील कमी झालें. आता या कुंडाच्या एक-दोन बाजू तुटून गेलेल्या दिसतात.

या कुंडासमोरच कालिकेचें एक मोठें भव्य मंदिर आहे. हें मंदिर विक्रमशक आठच्या सुमारास बांधलेलें आहे. या मंदिरांतील नक्षीकाम सुंदर आहे. हल्लीं या मंदिरांत कालिकेची मूर्ति आहे; पण आठव्या शतकांत याच गाभाऱ्यांत सूर्याची मूर्ति होती असें म्हणतात. सूर्यकुंडांतून स्नान करून राजे सूर्याचें दर्शन घेत ते याच मंदिरांतील सूर्याचें असावें असें वाटतें. नंतर पुढे केव्हातरी कालिकेच्या मूर्तीची स्थापना झाली असावी. यावरून असें अनुमान निघतें की हें मंदिर व सूर्यकुंड मानमोरी या राजाच्या सुमाराचें असावें. चितोडवर परकीयांचे जे अनेक वेळां हल्ले झाले, तेव्हाच कधीतरी सूर्यमूर्तीचा नाश झाला असेल. पण मंदिर मात्र चांगल्या स्थितींत आहे. या मंदिरांतील जी श्याममूर्ति आहे ती प्राचीन असून दुसरी जी शुभ्र आरसपानाची मूर्ति आहे ती नंतरची असें कळलें. या मंदिरांत जाण्यासाठीं दहा-बारा



कालिकामातेचें मंदिर ( पृष्ठ ५८ )

पायऱ्या चढाव्या लागतात. मंदिर बऱ्याच उंचावर असल्यामुळें आस-पासचें सुंदर दृश्यहि सहजच दृष्टीस पडतें. वैशाख शुक्लपक्षांतील अष्टमीला येथे मोठी जत्रा भरते. या जत्रेला 'कालीका मेला' अगर 'चित्तौडी अष्टमी' असें म्हणतात.

उदयपुर सरकारकडून देवीच्या पूजे-अर्चेसाठीं एक गांव तोडून दिलेला आहे. अखंड नंदादीप आहे. महाराणा सज्जनसिंह यांनी देवळाचा जीर्णोद्धार केला आहे. आंतल्या मंडपांत वरच्या छतावरील नक्षीकाम व त्याचप्रमाणें तुळयांवरील नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. परंतु परकीयांच्या स्वाऱ्यांत साऱ्या नक्षीकामावरून हात फिरलेले दिसतात. सर्व पुतळ्यांचीं तोंडें विद्रुप करून टाकलेलीं आहेत. देवळाचें आवार खूपच मोठें आहे. पुजारी बावाजी वरच राहत असतो.

येथून पुढे गेलें की राणी पद्मिनीचा महाल लागतो. या महाला-संबंधाने येऊन गेलेलेंच आहे. या महालाच्या पुढे आणखी गेलें की एक पडकी इमारत दिसते. ही 'बादशहा की झाकसी' म्हणजे तुरुंग होय. राणा हम्मीराने प्रथम याच जागेंत महंमद तघलक याला पकडून आणून तीन महिने कैद करून ठेवला होता. नतर याच इमारतींत राणा कुंभाने माळव्याचा सुलतान महंमदशाहा याला कैद करून ठेवला होता. पकडून आणलेल्या राजांना येथे ठेवीत असत.

एवढें पाहून झाल्यानंतर पुनः टांग्यांत बसून आम्ही कुंभश्यामच्या मंदिरा-कडे गेलों. या मंदिरालाच कोणीं कोणीं मीराबाईचें मंदिर असें म्हणतात. परंतु हें कुंभश्यामचें मंदिर महाराणा कुंभाने आपल्या नांवावरून बांधलेलें आहे.

# प्रकरण १४ वें

महाराणा कुंभाने कुंभश्यामचें मंदिर बांधून त्यांत विष्णुश्याम-नाथाची मूर्ति स्थापन केली आहे. याशिवाय विष्णूच्या दशावताराच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. एकंदर कलाकुसरीचें काम फार सुबक आहे. परंतु एकाहि मूर्तीचा चेहरा चांगला राहिलेला नाही. मुसलमानांनी यांतील सर्वच सुंदर चित्रांचे चेहरे ओरखडून टाकले आहेत.

मीराबाई ज्या मंदिरांत भजन करी तें लहानसें श्यामनाथाचें मंदिर या कुंभश्यामच्या मंदिराच्याच आवारांत दक्षिण भागाला आहे. या मंदिरांत गिरिधारीची लहानशी मूर्ति आहे. याला गिरिधरगोपालचें मंदिर असेंहि म्हणतात. या मंदिराच्या समोरच एक छोटीशी छत्री आहे, ती मीराबाईचा गुरु रैदास (रोहिदास) चांभार याची होय. या छत्रींत वर जायला चार-पांच पायऱ्या आहेत, खालीं आरसपानावर पावलें कोरलेलीं आहेत, आणि मुख्यतः या छत्रीच्या वरच्या छतावर एक पुतळा कोरलेला आहे, तो अवश्य पाहाण्यासारखा आहे. हा चबुतरा अगर छत्री अगदी साधी आहे. वर कोणीं चढण्याचें श्रम घेणार नाही, आणि वर चढल्यावर छताकडे एवढें निरखून कोणीं पाहाणार नाही. परंतु या साध्या छत्रीच्या छतावर एक कोडें घातलेलें आहे. वरचा पुतळा एका पुरुषाचा आहे, मध्यें एकच तोंड असून त्या एकाच तोंडाला पांच शरीरें अशा बेमालुम रीतीने कोरलेलीं आहेत की, कोणत्याहि बाजूने पाहिलें तरी एका



रोहीदासाची छत्री ( पृष्ठ ६० )

पुरुषाची आकृति दिसावी. एका बाजूने तो पुतळा पाठमोरा बसलेला दिसतो तर दुसऱ्या बाजूने समोर बसलेला दिसतो, डावीकडून अर्धवट दिसतो, उजवीकडून दुसरी बाजू दिसते व पांचवी बाजू कूस फिरविलेली आहे; असे सारे कोन साधून मोठा मार्मिक बनविला आहे. ज्याने कल्पना काढली त्या कारागिराचें खरोखरींच यांत कौशल्य दिसून येतें. एक ब्रह्म आणि पंचतत्त्व असा कांहीसा अर्थ त्यांत असावा असें वाटतें.

मीराबाईविषयीं अनेक कथा-दंतकथा आहेत. ती मोठी भगवद्भक्त होऊन गेली. ती फारशी विद्वान् नव्हती—नव्हे तिला लिहितां-वाचतांसुद्धा येत नव्हतें—असें म्हणतात, पण मनाच्या आवेगांत तिने परमेश्वराला आळवितांना जी कवनें आणि भजनें केलीं आहेत तीं मोठीं रसाळ व प्रेमळ आहेत. तिचीं भजनें नंतर फारच लोकप्रिय झालीं. आपल्या मराठी भाषेंतील गायिका ज्यांना गायनहिरा म्हणून म्हणतात, त्या हिराबाई बडोदेंकर यांचें एक भजन आहे तें सर्वांनी ऐकलेंच असेल : ‘तुम बिन मोरी कोन खबर ले गोवर्धन गिरिधारी’, तें मीराबाईचेंच भजन आहे.

राजस्थानचा इतिहास प्रथम कर्नल टॉड याने लिहिला. पण मीराबाईविषयीं लिहितांना तो म्हणतो कीं मीराबाई ही महाराणा कुंभाची राणी होती. टॉडने ही मोठीच चूक केली आहे. कुंभानंतर कितीतरी वर्षांनी मीराबाईचा जन्म झाला. कुंभाचा मुलगा रायमल्ल, रायमल्लाचा सांगा, आणि सांगाचा मुलगा भोजराज याची—म्हणजे कुंभाच्या पणतवाची—ती पत्नी होय.

कोणीं म्हणतात तिने लग्नच केलें नव्हतें. ती सिसोदिया वंशांत

जन्मली होती. पण तीहि गोष्ट खरी नाही. हिंदी इतिहासकार पंडित गौरीशंकर ओझा वगैरे विद्वानांनी मीराबाईच्या संबंधाने आता पुष्कळ गोष्टी प्रकाशांत आणल्या आहेत. मारवाडांतील कुडकी नांवाच्या गांवीं मीराबाईचा जन्म सन १४९८ मध्यें झाला. तिच्या बापाचें नांव राव रत्नसिंह राठोड असें होते. तिची आई लहानपणींच वारली होती. पुढे तिचा बापहि राणा सांगाबरोबर खानव्याच्या लढाईवर गेला व तेथेच कामास आला. तेव्हा तिचा आजा राव दुदाजी याने तिचा प्रतिपाळ करून तिला वाढविली. ती लहान असतांनाच तिच्या आजाकडे एक साधु आला होता. त्याच्याजवळ घनःश्याम विष्णूची एक सुंदर मूर्ति होती. ती पाहून मीराला वाटलें, आपल्याला ही मूर्ति मिळेल तर बरें होईल—नव्हे त्या मूर्तीसाठीं ती हट्टूनच बसली. तिचा हट्ट पाहून साधु म्हणाला, "मुली, ही मूर्ति मी तुला देईन, पण ही कांही खेळाची बाहुली नाही. हा देव आहे, याची रोज पूजा व्हायला पाहिजे, नाहीतर देवाचा राग होईल. तूं रोज पूजा करशील का?"

"हो करीन. पण मग देव माझ्यावर प्रसन्न होईल का?" छोट्या मीराबाईने विचारलें.

साधु हासून म्हणाला, "हो. तुझी तशीच भक्ति दिसली तर देव तुला दर्शन देईलहि." ती मूर्ति मिळतांच मीराबाईला पराकाष्टेचा आनंद झाला आणि आपण भक्ति केली तर देव खात्रीने दर्शन देणार या साधूच्या वचनावर तिचा पूर्ण भरंवसा बसला. तिला दुसरें कांहीच सुचायचें नाही. ती त्या मूर्तीचीच सेवा करूं लागली; पण असें किती दिवस चालणार? ती बारा-तेरा वर्षांची झाली तेव्हा दुदाजीने तिचा

विवाह राजपुत्र भोजराज याच्याशीं करून दिला. खरें पाहिलें तर ती लग्नाच्या विरुद्ध होती. परंतु तिचें कोणींच ऐकलें नाही. ती म्हणे नाशवंत शरीराच्या माणसाशीं मला लग्न करायचेंच नाही. मी माझ्या गिरिधारीशींच लग्न करीन. शेवटीं लग्नाच्या वेळेस जेव्हा फेरा फिरण्याचा प्रसंग आला तेव्हा गिरिधारीची मूर्ति हातांत घेऊन ती फेरा फिरली. हेतु हा की आपण या गिरिधारीशींच लग्न करीत आहोंत.

लग्नानंतर मीराबाई सासरीं चितोडला आली; पण तिचें सारें लक्ष या मूर्तीकडेच असे. त्यामुळें तिला फार त्रास होई. पण ती तिकडे लक्षच देत नसे. पुढे पांच-सहा वर्षांनी तिचा पति भोजराज मरण पावला. त्यामुळें तिच्या सासरची मंडळी कोणींच तिच्याकडे फारसें लक्ष देईनात. माहेरींहि कोणीं राहिलें नाही. त्यामुळें ती आपल्या गिरिधारीच्या भजन-पूजनांतच रात्रंदिवस मग्न असे. तिचा सासरा राणा सांगा जोंपर्यंत हयात होता, तोंपर्यंत तिला फारसा त्रास होत नव्हता असें वाटतें. परंतु सांगाच्या मृत्यूनंतर तिचा दीर विक्रमादित्य गादीवर आला, तेव्हा त्याला मात्र मीराबाईची ही भगवद्भक्ति सहन होईना. कारण मीराबाई आता तर आपल्या श्यामजीच्या मंदिरांत जाऊन भजन करीत असे. राजपूतांत पडद्याची चाल असल्यामुळें मीराबाईचें हें वर्तन लोकांना दोषास्पद दिसूं लागलें. ती पडदा वगैरे मुळींच ठेवीत नसे. त्याचप्रमाणें साधुसंतांच्या भेटी घेई. देवाच्या नांवाने भजन करी, टाळ घेऊन नाचे. राणा विक्रमा-दित्याने तिला पुष्कळ प्रकारें सांगून पाहिलें, पण ती लक्षच देईना. तेव्हा चिडून त्याने तिचा छळ मांडला. विषाचा पेला तिच्याकडे पाठवून निरोप धाडला की, ‘ हें चरणामृत आहे.’

मीराबाईने पाहिलें हें हलाहल विष आहे. पण चरणामृत म्हटल्यावर त्याचा अव्हेर करणें शक्य नाही. तिने गिरिधारीचें नामस्मरण करून विष पिऊन टाकलें. त्या विषाची बाधा तिला झाली नाही. मग राणाजीने एका पेटींत एक जिवंत साप पकडून घातला आणि मीराबाईकडे पाठवून म्हटलें, 'यांत शाळिग्राम आहे.' मीराबाईने लगेच त्या पेटीला भक्तिभावाने वंदन करून उघडली, तों आंत एक सुंदर शाळिग्राम व एक ताज्या फुलांचा हार निघाला. त्यांत साप होता ही गोष्ट नंतर तिला कळली आणि तिला फार वाईट वाटलें. भक्तिभावाने तिचें अंतःकरण भरून आलें. "देवा! माझ्यासाठीं तुला किती कष्ट पडतात हे!" असें तिच्या मनांत येऊन तिने भक्तिभावाने रसाळ असें एक भजन म्हणायला सुरवात केली :

मेरे राणाजी, मैं गोविंद-गूण गाना ॥ धृ० ॥
राजा रूठे नगरी रक्खे अपनी, मैं हर रूठया कहा जाना? ॥ १ ॥
राणे भेजा जहर पियाला, मैं अमृत कह पी जाना ॥ २ ॥
डबिया में काला नाग भेजा, मैं शालग्राम कर जाना ॥ ३ ॥
मीराबाई प्रेम-दिवानी, मैं साँवलिया वर पाना ॥ ४ ॥

नंतर तर मीराबाईला अतिशय उद्वेग वाटायला लागला. कारण आधींच तिची ईश्वरावर फार भक्ति होती, त्यांत आपल्यामुळें राणाजीला त्रास होतो व परमेश्वराला संकटांत पडावें लागतें तेव्हा मेवाड देशांतच राहूं नये असें तिच्या मनांत घेतलें व ती तेथून मथुरेकडे निघून गेली. तीर्थकांठीं राहून तर तिची भगवद्भक्ति जास्तच वाढली. साधूसारख्या वेषाने राहून तिने अनेक यात्रा केल्या आणि शेवटीं ती द्वारकेस गेली.

ती निवून गेल्यानंतर मात्र राणा विक्रमादित्याला तिची योग्यता कळली आणि आपण मीरांबाईसारख्या साध्वी ईश्वरभक्त स्त्रीला त्रास दिल्याबद्दल त्याला पश्चात्तापहि झाला. या वेळी मीरांबाई द्वारकेस असल्याचें त्याला कळलें होतें व मोठी भगवद्भक्त मीरां म्हणून तिची कीर्ति झालेली पण त्याच्या कानावर आली होती. तिला परत चितोडला बोलावून आणावी म्हणून त्यानें एका ब्राह्मणास पाठविला. पण मीरांबाईला आतां संसाराची अथवा नात्यागोत्याच्या माणसांची पर्वा नव्हती. संसाराला तर ती विटलेलीच होती. देवाचे पाय सोडून परत मेवाडांत जाण्याचें तिच्या मनांत आलें नाही. पण राणाजींनी आग्रहानें बोलावलें आहे असे तो ब्राह्मण म्हणाला आणि तिला फार आग्रह करूं लागला. तेव्हा ‘ मी द्वारकाधीशाचं दर्शन घेऊन येते ’ असें म्हणून ती देवळांत गेली, ती पुनः बाहेर आलीच नाही. कोणी म्हणतात द्वारकानाथाच्या मूर्तींत ती विरून गेली, कोणी म्हणतात ती गुप्त-पणें कुठें तरी निघून गेली आणि कोणी म्हणतात ती गोमती नदींत बुडून गेली.

मेवाडांत पद्मिनीसारख्या सती स्त्रिया होऊन गेल्या, तशाच मीरांबाई-सारख्या भगवद्भक्त साध्वी स्त्रियाहि होऊन गेल्या. मेवाड देशाला मीरादेश-सुद्धा म्हणतात.

वयाच्या ७५ व्या वर्षीं मीरांबाईचा अंत झाला. तिने ज्या कविता केल्या त्यांत मोठा प्रासादिकपणा किंवा मोठी प्रतिभा नसेल, पण तिची साधीसुधी प्रेमळ भाषा आणि अंतःकरणाची तळमळ मात्र त्यांत स्पष्ट दिसून येते. मीरांबाईच्या वेळीं स्त्रियांना मुळींच शिक्षणाचा गंध नव्हता, आणि राजपूत लोकांतील त्या वेळचा पडदा ! पण मीराबाईच्या अंतःकरणांत

खरा भक्तिरस वाहत होता, म्हणूनच तिला पद्यरचना करतां आली आणि तिचीं भजनें लोकप्रिय झालीं !

# प्रकरण १५ वें

मीरांबाईच्या श्यामनाथचें दर्शन घेऊन आम्ही निघालों व पुनः टांग्यांत बसलों. येथून जवळच ' चतरंग मोरी ' नांवाचें एक मोठें सरोवर आहे. हें सरोवर सातव्या शकापूर्वींचें आहे. बाप्पा रावळ याने मानमोरी राजाजवळून चितोड घेतलें, परंतु मानमोरीच्याहि पूर्वी चितोडवर चित्रांग नांवाचा राजा राज्य करीत होता, आणि तेव्हापासूनचें तें सरोवर असावें असें वाटतें. त्या सरोवराकडे जायला रस्ता अवघड आहे. टांगे तिकडे जाऊं शकत नाहीत. त्याचप्रमाणें आम्हांला तेवढा वेळसुद्धा नव्हता. कारण एवढें सारें सावकाशीने पाहायचें म्हणजे दोन-तीन दिवसांचा तरी मुक्काम तेथेच करायला पाहिजे. त्याप्रमाणें वर राहायला तशी सोयसुद्धा नाही. तेव्हा शक्य तेवढें पाहून घेण्याचाच विचार केला होता. चतरंग सरोवर पुकळ मोठें आहे असें म्हणतात. याच सरोवराच्या पश्चिम दिशेला वैद्यनाथ महादेवाचें एक जुनें मंदिर आहे.

गडावर जे बुरूज आहेत त्यांत एक बुरूज ' बीकाखोह ' (बिकट कंदरा) नांवाचा आहे. हा बुरूज अवघड जागेवर आहे तरी इ. स. १५३७ त बहादुरशहाने याच्याखाली सुरुंग लावून तो उडवून दिला होता.

दुसरा एक चितोडी बुरूज आहे. हा बुरूज किल्ल्याच्या मागील भागाला आहे. या बुरूजाच्या खाली सुमारें दीडशे फूटाच्या अंतरावर दुसरा एक बुरूज आहे. या बुरूजाला ' मोहर मगरी ' किंवा ' हरामखोर मगरी '

असेंहि म्हणतात. मगरी म्हणजे टेकडी होय. या हरामखोर टेकडीसंबंधानें अशी हकीकत आहे कीं, अकबरानें किल्ल्याला जेव्हां वेढा दिला होता तेव्हां किल्ला हातीं येण्याचें चिह्न दिसेना. काय उपाय करावा म्हणून अकबर एकसारखा विचार करीत होता. शेवटीं त्याला एक युक्ति सुचली. ती अशी कीं, चितौडी बुरूजाचा वेध घेऊन एक कृत्रिम टेकडी करून त्या टेकडीवरून तोफमारा करावा म्हणजे चितौडी बुरूज निकामी झाल्याशिवाय राहायचा नाही. पण या बुरूजावर राजपुतांचें संरक्षणसुद्धा उत्तम होतें. टेकडी तयार करणें तेवढें सोपें काम नव्हतें. परंतु अकबरसुद्धा कमी कल्पक नव्हता. त्यानें असें जाहीर केलें कीं, एक मातीचें टोपलें अगर दगडाचें टोपलें आणून टाकणाराला एक मोहोर मजुरी मिळेल. त्याच्याजवळ पैशाचें बळ होतें मग काय मोहरांच्या आशेने भराभर माती व दगडांची रास होऊं लागली. इकडून राजपुतांकडून त्या नव्या टेकडीवर तोफमारा होत होताच. जीवाच्या धोक्यांत मोहरांच्यासाठीं प्राण देणारे मजुर अकबराला मिळत होते. शेवटीं पाहिजे तेवढी टेकडी तयार होतांच त्या टेकडीवर तोफा चढवून अकबरानें चित्तौडी बुरूजावर तोफमारा चालविला. ही टेकडी होत असतांना अकबराचें अतोनात नुकसान होत होतें. मनुष्यहानि व द्रव्यहानि खूपच झाली. शिवाय टेकडी तयार होण्यापूर्वींच किती वेळा तरी कोसळून पडली असेल. पण अकबरानें धीर सोडला नाही. जों जों टेकडीचें काम पुरें होईना तों तों तो हट्टासच पेटला आणि अखेरीस टेकडी पुरी होऊन त्यावर तोफा चढतांच त्याला पराकाष्ठेचा आनंद झाला! शेवटीं याच हरामखोर मगरीनें चितोडचा नाश केला असें म्हणावें लागतें!

तोफमाऱ्यापुढें चितौडी बुरूजाचा टिकाव न लागतां तो कोसळलाच.

पुढे अकबराला जय मिळाला. अजूनसुद्धा राजपूतांत या टेकडीवरून अशी एक म्हण प्रचारांत आहे की, कोणाला जर एखादा शत्रू असला तर त्याला म्हणतात कीं, चितोडच्या चितौडीसारखा तो त्याचा वैरी आहे.

येथेच एक राजटिला अगर आमखासका चबूतरा आहे. मौर्यवंशीय राजांचा राज्याभिषेक येथेच होत असें म्हणतात. पूर्वीं याच भागांत किल्ल्याची वस्ती होती, अजूनहि पडलेल्या जुन्या घरांच्या भिंती दिसतात.

गोरा आणि बादल या दोघां चुलत्या-पुतण्यांचीं स्मारकें येथून जवळच आहेत. गोरा हा पद्मिनीचा चुलता व बादल तिचा चुलत भाऊ होते. अल्लाउद्दीनाने पुन: दुसऱ्याने जेव्हा चितोडवर स्वारी केली त्यावेळी गोरानं अत्यंत पराक्रम करून रणांगणावर देह ठेवला. बारा वर्षांच्या बादलच्या अंगावरसुद्धां खूप जखमा झालेल्या होत्या. पण तो जिवंत होता. आपल्या चुलत्याच्या मृत्यूची वार्ता सांगण्यास जेव्हा तो त्याच्या चुलतीकडे–गोराच्या बायकोकडे–गेला, तेव्हां प्रथम त्याच्या तोंडून शब्दच फुटेना. गोराची बायको मोठी सती होती. ती सारें समजून चुकली होती. बादलच्या तोंडाकडे पाहून ती म्हणाली, "बादल, मी सारं समजलें आहे. पण तुझ्या काकाने पराक्रम तरी कसा केला तेवढें सांग, आणि माझ्या सती जाण्याची तयारी कर."

चुलत्याच्या पराक्रमाचें वर्णन करतांना बादलच्या अंगीं वीरश्री चढली. त्याच्याकडे पाहून गोराची पत्नी समाधानाने म्हणाली, "बादल, तुझ्या काकासारखाच पराक्रम तुझ्या हातून होईल. जा, हा माझा तुला आशीर्वाद आहे!" नंतर ती सती गेली. दुसरे दिवशीं बादलनेसुद्धा चुलत्यासारखाच–उलट

जास्तच–पराक्रम करून धारातीर्थीं देह ठेवला. त्या दोघांचीं स्मारकें करण्यांत आलेलीं आहेत. पद्मिनीच्या जन्माबद्दल अजून खरी हकीकत कळलेली नाही. कोणी म्हणतात ती सिंहलद्वीप (सिलोन) मध्यें जन्मली. पुराणांत मात्र अशी एक गोष्ट आहे की, पद्मिनी जातीच्या स्त्रिया सिंहलद्वीपांतच होतात. आणि ही पद्मिनीसुद्धां जातीने पद्मिनी असून राणा रत्नसिंहाने तिला सिंहलद्वीपांतूनच आणली होती. स्त्रियांचीं चार लक्षणें पुराणांत वर्णिलेलीं आहेत–पद्मिनी, चित्रिणी, हस्तिनी आणि शंखिणी. पद्मिनी ही अत्यंत सुंदर गणली जाते. परंतु चितोडची पद्मिनी सिंहलद्वीपचीच होती किंवा काय हें अजून निश्चित नाही.

मोकलजीचा आजा रणमल्ल राठोड याची एक हवेली पण येथे आहे. रणमल्लाने आपलें प्रस्थ चितोडवर बरेंच माजविलें होतें. राणा कुंभासारखा हुशार राजा जर त्या वेळीं नसता, तर रणमल्लाने आपल्या पणतवाला ठार मारून चितोड बळकावलेंच असतें. त्याची हवेली आता पडून गेली आहे. चितोडच्या किल्ल्यावर पडक्या इमारती असंख्य आहेत. इ. स. १८८२ नंतर केव्हातरी महाराणा सज्जनसिंह यांनी पुष्कळ इमारतींची दुरुस्ती केली. पण अशा किती इमारती दुरुस्त करणार ? येथे जवळच एक जोहार स्थान आहे.

भीमलत्ताकुंड नांवाचें एक कुंड आहे. अदबदजीका मंदिर म्हणून एक मंदिर आहे. अभ्दुतजीचें म्हणजे अदबदजी झालेलें आहे. हें मंदिर महाराणा रायमल्ल याने बांधविलें. यांत एक मोठी विशाल शंकराची मूर्ति आहे. या मूर्तीचेंच नांव अद्भुत असें पडून अपभ्रंशानें अदबद असें झालें आहे.

# प्रकरण १६ वें

आता संध्याकाळ व्हायला आली होती, आणि पाहायचें तर बरेंच राहिलें होतें ! तेव्हा किल्ल्याखाली जातां जातां जीं महत्त्वाचीं स्थळें वाटेंत लागतील तेवढीं पाहून घ्यावयाचीं असें ठरविलें. प्रत्येक ठिकाणीं टांग्यांतून उतरचढ करण्याचासुद्धा त्रास होऊं लागला होता. या भागांत एक देऊळ आहे. कोणी म्हणतात तें महाराणा कुंभानें ब्रह्मदेवाचें बांधलेलें होतें. कारण मंदिर हल्लीं पडून गेलेल्या स्थितींत असून उदयपूर राज्याकडून दुरुस्तीचें काम चालूं आहे. या मंदिरासंबंधानें अनेक मतें आहेत. कोणा म्हणतात, मोकलजीचा बाप लाखा राणाने बांधलें होतें, आणि तें पडून गेलें असतांना मोकलजीनें त्याचा जीर्णोद्धार केला. तर कोणी म्हणतात कुंभाने आपल्या पित्याच्या नांवाने बांधलें होतें. कारण या मंदिराला ‘ मोकलजीका मंदिर ’ असेंच म्हणतात. या मंदिरांत दोन शिलालेख सांपडले आहेत. त्यावरून हिंदी इतिहासकार पंडित गौरीशंकर ओझा यांनी असें संशोधनपूर्वक सिद्ध केलें आहे की, हें मंदिर इ. स. तेराव्या शतकामध्यें माळव्याचा विद्वान् भोजराजा याने समिद्धेश्वर महादेवाचें बांधलेलें आहे.* आणि या मंदिराचा जीर्णोद्धार इ. स. चौदाव्या शतकामध्यें मोकलजीने केला. त्यावरून मोकलजीचें

---


* समिद्धेश्वर महादेवाचें मंदिर माळव्याच्या भोजराजाने बांधलेलें असावें. कारण इ. स. तेराव्या शतकाच्या अखेरीस केव्हातरी चितोड मुंजराजाने जिंकलें होतें व प्रमाराची सत्ता कांही काल चितोडवर होती.

नांव पडलें असावें. पण हें मंदिर ब्रह्मदेवाचें नसून महादेवाचें आहे एवढें मात्र खरें. ब्रह्मदेवाचें एकच मंदिर असून तें अजमीर येथे पुष्करतीर्थी आहे. आणि खरोखरीच तें मंदिर पाहण्यासारखें आहे.

सूरजपोल नांवाचा पुढें एक दरवाजा लागला. यालाच तोरण दरवाजा म्हणत. कारण पूर्वी याच दरवाजांतून अधिक रहदारी होती. पूर्वीचा दरवाजा मोडून गेला होता, म्हणून हा दरवाजा महाराणा फत्तेसिंहजी यांनी पुन्हा नवीनच करविला. म्हणून हल्लीं या दरवाजाला नवी पोल असें म्हणतात. येथून समोरच्याच पहाडांत वाघ आहेत आणि शिकारीची जागा मुद्दाम तयार केलेली आहे. हल्लींचे महाराणा भूपालसिंहजी केव्हा इकडे आले तर शिकारीला खास येतात.

याच दरवाजाजवळ सांईदासजी साळुंत्रा याचें स्मारक आहे. हा सांईदास सन् १५६७ मध्यें अकबराच्या वेढ्याचे वेळीं अतिशय शौर्याने लढून शेवटीं रणांगणावर पडला. त्याचें हें स्मारक असें कळलें.

समोर एक उंच मनोरा दिसला. तो कसला म्हणून चौकशी करतां तो जैन कीर्तिस्तंभ असल्याचें कळलें. या स्तंभासंबंधानें पंडित गौरीशंकर ओझा असें म्हणतात की, हा स्तंभ विक्रम संवत् चौदाव्या शतकांत दिगंबर जैनसांप्रदायी बघेरवाला महाजन सावकार नायक याचा मुलगा जीजा याने बांधला. हें आदिनाथाचें स्मारक आहे, असें पंडितजींचें म्हणणें आहे. हा स्तंभ ८० फूट उंच असून नक्षीकाम चांगलें आहे. कुंभाच्या जयस्तंभापेक्षा लहान असल्यामुळें याला छोटा स्तंभ असेंहि म्हणतात. या स्तंभाच्या जवळच एक पडकें मंदिर आहे. हें मंदिर राणा कुंभाने महावीर स्वामीचें बांधलें होतें. पण पुढे तें पडून गेलें असतांना



शृंगारचौरी किंवा जोधबाईचें मंदिर

वि. सं. १४१५ मध्यें ओसवाल महाजन गुणराज याने जीर्णोद्धार केला असेंहि पंडित ओझा म्हणतात.

वाटेंत सडकेवरून पुढे गेलें की फतहप्रकाश महालाकडे जातां येतें. हा महाल महाराणा फत्तेसिंहजी यांनी बांधला आहे. या महाराणाजींना नव्या इमारती बांधण्याचा बराच शोक असावा असें दिसलें. कारण त्यांनी राज्यावर बसल्यानंतर ठिकठिकाणीं जुन्या इमारतींच्या दुरुस्त्या व कांही कांही नव्या इमारती बांधलेल्या आहेत. चितोडगडावरच त्यांनी किती तरी नव्या इमारती व अनेकांच्या दुरुस्त्या केलेल्या आहेत. महाराणा कुंभाचा महाल पुन्हा बांधावा असा महाराणा सज्जनसिंह यांचा विचार होता व त्याप्रमाणे त्यांनी थोडेसें काम सुरूंहि केलें होतें, पण त्यांच्या मृत्यूनंतर महाराणा फत्तेसिंह गादीवर आले आणि कुंभाचा पडलेला महाल दुरुस्त करणें अशक्यच आहे असें त्यांना वाटलें असावें; कारण तो पडलेला महाल अशा स्थितींत आहे की त्याची मूळ कल्पना येणेंच शक्य नाही. तेव्हा तो महाल दुरुस्त करण्यापेक्षां नवाच बांधावा असें वाटून त्यांनी हा फत्तह-प्रकाश बांधला आहे. हा महाल आंत जाऊन पाहण्यासारखा आहे. या महालांत बाप्पा रावळपासून होऊन गेलेल्या सर्व राजांच्या तसबिरी आहेत, उंची फर्निचर आहे—एकंदरीने अगदी अद्यावत् तऱ्हेने सजलेला आहे. यांत पॅरिसहून आणलेलीं लाल रंगाचीं मोठमोठालीं सुंदर झुंबरें आहेत. आंतल्या चौकांतून गेलें की रणवास ( म्हणजे राणीसाहेबांची राहण्याची जागा ) लागतो. राण्यांना किती पडदा असतो ती कल्पना येथे येते. महा-राणाजी व महाराणीजी येथे कधी कधी राहायला येतात असें कळलें.

नंतर सडकेवरच मोतीचौक नांवाचें ठिकाण आहे. चितोड जेव्हा

राजधानीचें ठिकाण होतें तेव्हा येथे मोठमोठे जवाहिरे राहत असत आणि हा जवाहिराचा बाजार होता. लक्षावधी रुपयांच्या किंमतीच्या हिरेमाणकांचा जेथे नित्य व्यवहार होत असेल, तेथे हल्लीं चौक हें फक्त नांवच शिल्लक आहे. एके काळीं येथे मौल्यवान् जवाहिरांचीं दुकानें होतीं याचें कांहीं नांवनिशाणसुद्धा दिसत नाही.

मोतीबाजाराच्या रस्त्याने पूर्वेकडील बाजूला भीमगोडी नांवाची एक बाव आहे. पांडव जेव्हा या किल्ल्यावर आले तेव्हा कुंतीला तहान लागली व जवळपास पाणी दिसेना तेव्हा भीमाने हातांतला दंडा जमिनीवर जोराने आपटला आणि त्या जागेवर एक खोल खड्डा पडला. त्यांतून पाणी निघालें तीच ही पुढे बाव (विहीर) झाली.

आम्ही पुढे कुकडेश्वर कुंडावर गेलों. मागील सहाव्या प्रकरणांत भीमाने किल्ला बांधल्याची हकीकत आली आहे. ज्या ऋषीने कोंबड्या-सारखा आवाज करून भीमाला फसविला त्याच्या नांवाने हें कुंड कुकडे-श्वराचें म्हणून म्हणतात व जवळच कुकडेश्वर महादेवाचें मंदिरहि आहे. कुकडेश्वराचें कुंड मात्र सुंदर आहे. वरून डोंगरांतून पाण्याचा झरा या कुंडांत वाहात असतो. पाणी पुष्कळ असून स्वच्छ आहे. या कुंडांत लाल रंगाचें फूट दीड फूट लांबीचे मासे खूप आहेत. भाजलेले चणे खायला घातले म्हणजे पायरीपर्यंत सळसळ धावत येतात. त्यांतच लाल, पांढरे व काळे मासेसुद्धा आहेत. हे तिन्ही रंगाचे मासे चण्यासाठी जेव्हा धावपळ करतात तेव्हा मौज दिसते. हे लाल मासे फक्त याच पाण्यांत जगतात. दुसरीकडे कुठल्याहि पाण्यांत नेऊन टाकले तर मरून जातात. यावरून या कुंडांतील पाण्यांतच तसा कांही गुण असावा असें वाटतें.

आपण कुंडावर गेलों की चणेवाला चणे घेऊनच येतो. ते विकत घेऊन आम्ही कुंडांत टाकले तों मासे धडपडत आलेच.या कुंडाजवळच अन्नपूर्णा मातेचें मंदिर आहे. हें मंदिर महाराणा हम्मीराने विक्रम संवत चौदाव्या शतकांत केव्हातरी बांधलें असावें. दुसरें देऊळ बाणमातेचें असून तें बाप्पा रावळाने बांधलेलें आहे असें म्हणतात. त्याशिवाय, चतुर्भुजाजीचें देऊळ, सासबहूचें देऊळ आणि लक्ष्मीनारायणाचें देऊळ अशींहि देवळें जवळ जवळ आहेत.

सासबहूच्या देवळाजवळच एक माताजीचें कुंड म्हणून कुंड आहे व दरवाजाजवळ राघवदेवाची छत्री आहे. राघवदेव म्हणजे राणा कुंभाचा काका ज्याला रणमल्लाने मारविला व जो मेवाडच्या लोकांचा आवडता होता तोच होय.

याशिवाय, आणखीहि कितीतरी मंदिरें व मोडक्या इमारती, महाल, जैन मंदिरें, कुंड वगैरे चितोड किल्ल्यावर आहेत. परंतु आम्हांला थोड्या वेळांत सारें पाहणें शक्य नव्हतें. त्यामुळें शक्य तेवढीं महत्त्वाचीं स्थळें पाहून घेतलीं व बाकीच्या स्थळांची माहिती घेतली. गडावर एक ‘ हिंगूला अहाडा के महल ’ म्हणून जैन मंदिर आहे. पूर्वींचे राणा उदयपूरनजीक पुरुषा अहाडा नांवाच्या गांवीं राहात असत. त्यानंतर उदयसिंह—ज्याने उदयपूर वसविलें तो—या महालांत राहत असे आणि चितोडच्या राणांचें अहाडा असेंहि एक उपनांव आहे, म्हणून या महालाला अहाडा असें नांव पडलें. उदयसिंहाने नंतर उदयपूर शहर वसवून राजधानी तिकडेच केली. परंतु तो या महालांत राहत असे. म्हणून या महालांत दरवाजावर सकाळ-संध्याकाळ नौबद वाजत असते. त्याचप्रमाणे दसरा वगैरे सणाच्या दिवशीं येथे दरबार भर-

विण्यांत येतो आणि जिल्ह्याचे अधिकारी दरबारप्रसंगीं हजर राहतात. या महालाच्या जवळ एक मोठा तलाव आहे. रावळ रत्नसिंहाने बांधल्यामुळें त्याला रत्नेश्वर तलाव म्हणतात.

रत्नेश्वर तलावानंतर पुढे जाणारा एक रस्ता आहे. तिकडून लाखोटाबारी नांवाचा एक दरवाजा लागतो. या दरवाज्यांतून किल्ल्याखालीं जाण्याचा एक मार्ग आहे. या दरवाज्यांत लढाईच्या धामधुमींत लाखो योद्धे मृत्यु पावले म्हणून या दरवाज्याला लाखोटाबारी असें नांव पडलें.

आणखीहि बऱ्याच इमारती पाहण्याच्या राहिल्या. त्यांत एक खातणराणीचा महाल म्हणून आहे. नवगजापीर, रामपुरे की हवेली, सलूम्बर की हवेली, गऊमुख कुंड, सातबीस देवरिया वगैरे होत. पण यापुढे तेवढें सारें पाहायला वेळ नव्हता व पायसुद्धा दमले होते. टांगे होते, पण प्रत्येक स्थळ तर पायानेच पाहायला पाहिजे होतें ना? शिवाय, महत्त्वाचें पाहून झालें होतें.

चितोड किल्ल्यावर एकंदर त्र्याऐंशी लहानमोठीं तलाव व कुंडें मिळून जलाशयें आहेत. त्याशिवाय, मोठमोठ्या विहिरी ( बाव ) हि आहेतच. पूर्वीच्या काळांत जेव्हां परशत्रूंचा वेढा किल्ल्याभोवतीं पडे तेव्हा शत्रू बहुधा किल्ल्यावरील पाण्याच्या सांठ्याचा नाश करीत. पाण्याशिवाय किल्ल्यांतील लोकांचे प्राण कासावीस होऊन अखेरीस त्यांना शत्रूला शरण जावें लागे. पण चितोडच्या किल्ल्यावर पाण्याचा सांठा मुबलक असल्यामुळें वर्षानुवर्षे त्यांना वेढ्याचें काम लांबवितां येई. त्याचप्रमाणें किल्ल्यावर सपाट जमिनीसुद्धा पुष्कळ असल्यामुळें शेती पिकवून धान्याचा सांठादेखील करतां येई आणि किल्ला ज्या उंच जागेवर आहे तेथूनच बाजूला सपाट जमीन असल्यामुळें शत्रूसैन्य कोणत्याहि दिशेने आलें तरी किल्ल्या-

वरील लोकांना कळून बंदोबस्ताने राहतां येई. या एकंदर परिस्थितीमुळेच चितोडचा किल्ला अजिंक्य होऊन बसला होता. पण नुसत्या किल्ल्यामुळेंच कांही अजिंक्यपणा येत नाही हेंहि तत्रढेंच लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण शूरवीर रजपूत जीवावर उदार होऊन अहोरात्र किल्ल्याचें रक्षण करीत होते. कित्येक वेळा किल्ला शत्रूंच्या ताब्यांत गेलेला आहे, पण शूर राजपूतांनी पुन्हा तो परत जिंकून घ्यावा असेंच सतत चालत असे.

मेवाड हा देश राजपुतान्याच्या मध्यभागीं येतो. सिंधप्रांताकडून परकीयांच्या ज्या स्वाऱ्या होत, त्यांना राजपुतान्यांतून सरळ हिंदुस्थानांत येण्याला जवळचा मार्ग असल्यामुळे पहिल्याप्रथम मोगल, अरब, तुर्क वगैरे याच रस्त्याने टोळधाडीप्रमाणे येत. पण चितोडचे शूर राजपूत त्यांना सहजासहजीं पुढे जाऊं देत नसत. अनेक वेळा या परकीयांना हार खाऊन परत जावें लागे, आणि पुढे हिंदुस्थानांत शिरण्याची त्यांना हिंमत होत नसे. याचें सारें श्रेय बहुतांशीं बाप्पा रावळपासून त्याच्या वंशजांनाच द्यावें लागेल. बाप्पा रावळ याने तर सिंध प्रांत, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, अफगाणिस्थान, बलुचिस्थान व कंदहारपर्यंत लढाया मारून ठिकठिकाणीं विजय मिळविले होते. त्या काळीं पराकीयांना बाप्पा रावळचा भयंकर धाक वाटत असे. इकडे येणाऱ्या शत्रूंशींच तो झुंजत असे असें नव्हे, तर थेट शत्रूंच्या प्रांतांत जाऊन तो त्यांना चांगलाच चोप देऊन येई. बाप्पापासूनच राजपूत राजांच्या उत्कर्षास आरंभ झाला असावा. त्यानंतर त्याच्यामागून, खुमान, खेमसिंह, जैत्रसिंह, अजयसिंह, हम्मीरसिंह, क्षेत्रसिंह, लाखा, मोकल, कुंभ, सांगा, प्रताप, राजसिंह असे एकापेक्षां एक देशभक्त व शौर्यशाली राजे मेवाड देशावर विराजत होते. त्यामुळे मेवाडचें वैभव, मेवाडचें शौर्य-

वीर्य आणि गौरव साऱ्या हिंदुस्थानाला भूषण होऊन राहिला होता.

ज्या चितोडच्या शूर राजपूतांचें नांव ऐकतांच शत्रूच्या उरांत धडकी भरे आणि ज्या चितोडचें नांव इतिहासांत प्रामुख्याने आढळून येतें तें चितोड एकदा पाहावें असें कधीपासून तरी वाटत होतें. चितोड किल्ला पाहून झाल्यावर मनांत अनेक प्रकारच्या बऱ्यावाईट कल्पना आल्या आणि खाली उतरण्यापूर्वीं त्या पुण्यभूमीला पुन्हा एकदा मनांतल्या मनांत वंदन करून निघालों.

खाली गांवांत तसें विशेष पाहण्यासारखें नव्हतेंच. गांवांत कापडा-वर छापकाम चांगलें होतें असें ऐकलें, पण संध्याकाळ झाल्यामुळे तें पाहायला जाण्याचें रहीत करून स्टेशनाकडेच निघालों.

दुसरे दिवशींच आम्हांला निघायला गाडी होती. कधीपासून किल्ला पाहायचा होता तो तर पाहिला, पण मनाला पाहिल्याचा जसा आनंद वाटला तसा आजच्या जीर्ण स्थितींत पाहून उद्वेगहि वाटला! आगगाडींत बसल्या-नंतर कुंभाचा जयस्तंभ दृष्टीआड होईपर्यंत तो पाहण्याचा मोह कांही आवरतां आला नाही. मनांत म्हटलें—

'कालाय तस्मै नमः'—

स मा प्त

# श्री सयाजी बालज्ञानमाला

## ऐतिहासिक चरित्रें

| | | |
|---|---|---|
| १ | (४) **महाराणा प्रताप.** रमणलाल वसंतलाल देसाई, एम्. ए. [ गुजराती ] ( १९१९–१९२२ ) | ०–६–० |
| २ | (८) **औरंगजेब.** मनसुखलाल मोहनलाल पोटा, बी. ए. [ गुजराती ] ( १९१९–१९२२ ) | ०–६–० |
| ३ | (१०) **रणजितसिंह.** भरतराम भानुसुखराम महेता, ओ. टी. सी. ई. [ गुजराती ] ( १९२०–१९२३ ) | ०–६–० |
| ४ | (१२) **श्रीहर्ष.** भरतराम भानुसुखराम महेता [ गुजराती ] ( १९२०–१९२२ ) | ०–६–० |
| ५ | (१६) **बाल नेपोलियन.** दिनकरराय पुरुषोत्तमराय जोषीपुरा [ गुजराती ] ( १९१९–१९२५ ) | ०–६–० |
| ६ | (१९) **श्रीहर्ष.** पं. आनंदप्रिय आत्मारामजी, बी. ए., एल्एल्. बी. [ हिंदी ] ( १९२१ ) | ०–८–० |
| ७ | (२७) **लॉर्ड विलियम बेन्टिक.** हीरालाल हरजीवन गणात्रा, बी. ए. एल्एल्. बी., सॉलिसिटर [ गुजराती ] (१९२२). | ०–६–० |
| ८ | (२५) **नाना फडनवीस.** रमणलाल वसंतलाल देसाई, एम्. ए. [ गुजराती ] (१९२२) | ०–६–० |

| | | |
|---|---|---|
| ९ (२८) | **महादजी सिंधिया.** वल्लभराय लाभशंकर छाया, बी. ए. [ गुजराती ] ( १९२१ ) | ०–६–० |
| १० (३४) | **बाल बाबर.** मनसुखलाल मोहनलाल पोटा, बी. ए. [ गुजराती ] (१९२३) | ०–६–० |
| ११ (४१) | **विलियम युवर्ट ग्लॅडस्टन.** हीरालाल हरजीवन गणात्रा, बी. ए. एल्‌एल्‌. बी., सॉलिसिटर [ गुजराती ] ( १९२४ ) | ०–६–० |
| १२ (४२) | **शूरवीर शिवाजी.** भरतराम भानुसुखराम महेता, ओ. टी. सी. ई. [ गुजराती ] (१९२४) | ०–६–० |
| १३ (४७) | **छत्रपति संभाजी महाराज.** केशव मंगेश रांगणेकर, बी. ए. (१९२४) | ०–६–० |
| १४ (४८) | **महाराणा प्रताप.** परशुराम गोविंद काटदरे, बी. ए. ( १९२४ ) | ०–६–० |
| १५ (५१) | **ड्यूक ऑफ् वेलिंग्टन.** हीरालाल हरजीवन गणात्रा, बी. ए., एल्‌एल्‌. बी., सॉलिसिटर [ गुजराती ] (१९२४) | ०–६–० |
| १६ (६४) | **औरंगजेब.** पं. आनंदप्रिय आत्माराम पंडित, बी. ए., एल्‌एल्‌. बी. [ हिंदी ] ( १९२६ ) | ०–८–० |
| १७ (६६) | **चक्रवर्ती अशोक.** हरिराय भगवंतराय बुच [ गुजराती ] (१९२६) | ०–६–० |
| १८ (६७) | **बाल बाबर.** विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. (१९२६) | ०–६–० |
| १९ (७१) | **विलियम एवर्ट ग्लॅडस्टन.** विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. (१९२७) | ०–६–० |
| २० (८९) | **अशोक.** विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. (१९३१) | ०–५–० |
| २१ (९७) | **आपणा महाराजा.** चंद्रशंकर म. भट [गुजराती] (१९३३) | १–६–० |
| २२ (९८) | **कोलम्बस.** चंद्रशंकर म. | १–६–० |

IRBK-0102033

२३ (१०३) **कर्ण.** कवि रामराव मार्तंड भांबुरकर (१९३३) ०—६—०

२४ (१०५) **रामदास.** कवि रामराव मार्तंड भांबुरकर (१९३३) ०—६—०

२५ (१०७) **झांशीची शूर राणी लक्ष्मीबाई.** श्रीमती लक्ष्मीबाई प्रधान (१९३४) ०—६—०

२६ (१०९) **भीष्म.** वि. वा. जोशी (१९३४) ०—६—०

२७ (११४) **एलिचपूर.** य. खु. देशपांडे (१९३४) ०—६—०

२८ (११५) **चक्रधर.** दत्तात्रेय सीताराम पंगु, एम्. ए., राजाराम कॉलेज (१९३४). ०—६—०

२९ (१२४) **विमळशाह.** धीरजलाल टोकरशी शाह [गुजराती] (१९३५). ०—६—०

३० (१३२) **वस्तुपाळ तेजपाळ.** धीरजलाल टोकरशी शाह [गुजराती] ( १९३५ ) ०—६—०

३१ (१३५) **मीरांबाई.** सौ. पुष्पा र. वकील, बी. ए. [ गुजराती ] (१९३५) ०—५—०

३२ (१३८) **हेमचंद्राचार्य.** पंडित बेचरदास दोशी [गुजराती] ( १९३५ ) ०—८—०

३३ (१४५) **चंद्रहास.** रा. सा. ईश्वरलाल खानसाहेब, बी. ए. [गुजराती] (१९३७) ०—६—०

३४ (१४८) **महमद बेगडो.** प्रो. एम्. एफ्. लोखंडवाला, एम्. ए. [गुजराती] ( १९३७ ) ०—६—०

३५ (१५५) **सुलतान बहादुरशाह.** प्रो. एम्. एफ्. लोखंडवाला, एम्. ए. [गुजराती] (१९३८) ०—६—०

३६ (१५६) **आनंदीबाई पेशवे.** चिं. ग. कर्वे, बी. ए. ( १९४० ) ०—६—०

३७ (१६२) **चंद्रगुप्त (मौर्य)** गि. वा. आचार्य, बी. ए.
[गुजराती] ( १९४० ) ० ५-०

३८ (१६३) **मल्हारराव होळकर.** के. मं. रांगणेकर,
बी. ए. ( १९४० ) ०-६-०

३९ (१६४) **मलिक-अंबर.** वि. स. वाकसकर ( १९४१ ) ०- ६-०

४० (१६७) **रामानुजाचार्य.** डॉ. प्र. मो. मोदी,
एम्. ए. पीएच्. डी. [गुजराती] ०- ८-०

४१ (१७१) **गुरु नानक.** श्री. यो. ज. त्रिपाठी.
एम्. ए., बी. टी. [गुजराती] (१९४२) ०- ८-०

४२ (१७३) **गुरु गोविंदसिंह.** श्री. र. न. वहोरा
[गुजराती] (१९४२) ०- ८-०

४३ (१७४) **वीर वनराज.** श्री. धूमकेतु, अमदाबाद
[गुजराती] (१९४२) ०- ६-०

४४ (१७७) **संत कबीर.** श्री. किसनसिंह चावडा (गुजराती)
(१९४३) ०- ६-०

४५ (१७८) **वीर कुमारपाळ.** श्री. मूळजीभाई पी. शाह
( गुजराती ) (१९४३) ०- ८-०

४६ (१८१) **चितोड.** श्री. आनंदीबाई जयवंत (१९४४) ०- ६-०

४७ (१८४) **तुलसीदास.** रमणलाल ना. शाह
(गुजराती) (१९४४) ०- ६-०

म. ए. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
शा. क्र. २००७३ नों. दि. ............
वि. ............ क्र. ..................
ओ. पा.